PRGI Reg. No.MHMAR/25/A0219

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

वर्ष: १ अंक:७० पाने-८

नाशिक शनिवार, ९ ऑगस्ट २०२५ किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

अग्रलेख

## खरीखरी

### वेडपट ट्रम्प

अमेरिकेतील एका वेडपट किंवा मूर्ख माणसाच्या निर्णयांमुळे सर्व जगात उलथापालथ होत आहे. डोनाल्ड ट्रम्प नावाच्या एका बिनडोक प्राण्यामुळे केवळ भारतच नाही तर सर्व जग आणि जगातील सर्वजण चिंतातूर झालेले आहे. परवा या माणसाने भारतावरील कर रक्कम पंचवीस टक्के वरून ५०% वर नेलेली आहे. इतका बिनडोक मसाला या जगात कितीही शोधले. तरी कुठेही सापडणार नाही, या आधीही सापडला नसता यापुढेही सापडणार नाही. ज्याला थोडेसे शास्त्र आणि अर्थशास्त्र कळते तो माणूस कधीच अशा मनमानी आणि तुघलकी घोषणा करत नाही. अमेरिकेसारख्या राष्ट्राच्या सर्वोच्चपदी बसलेला राष्ट्राध्यक्ष म्हणजेच हा थेरडा गल्लीतल्या गावगुंडा सारखा चाळे करीत आहे. यामुळेच आता भारतावर निश्चितच दोस्त दोस्त म्हणून सध्या या ट्रम्पाने आणि दोस्तीचे पाणी आपल्या लहरी पंपाने उपसून नको त्या ठिकाणी डम्प केले आहे. आपल्या भारतामध्ये तुघलक नावाचा एक बादशहा आला होता. त्यानेही काही वेडेपणाचे चाळे केले होते हे मान्य आहे. पण असे शंभर तुघलक मारून गोळा केले आणि त्यातून ठेचून जर अर्क काढला तर एक ट्रम्प तयार होतो. हे भाकीत तुम्ही नोंदवून ठेवा. या वेड्याला म्हणे नोबेल हवे आहे, याच्यासाठी नोबेल पारितोषक देणाऱ्यांनी वेडेपणासाठीचे एक नोबेल पारितोषिक ठेवावे आणि त्याचा पहिला मान अजिबात अक्कल नसलेल्या या वेडपट ट्रम्पाला द्यावा. आम्ही परवाच याच्यावर लिहिले होते तेव्हा याचा वेडेपणा २५% होता. आता तो ५० % झाला आहे, त्यामध्ये जन्मजात ५० टक्के वेडेपणाची बेरीज केली म्हणजे तो ट्रम्पच असू शकेल. असे म्हणतात की शहाण्यांसाठी शब्दांचा मार असतो, वेड्यांना कशाला मारायचे ?

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

**रक्षाबंधन व नारळी पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!**



# मोदी- पुतिन चर्चा

## भारतभेटीचे निमंत्रण



नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था

**रशियाकडून तेल खरेदी करत असल्याच्या मुद्द्यावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय मालावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क लादले आहे. यादरम्यान भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी फोनवरून संवाद साधला. या दोन्ही नेत्यांमध्ये महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली, याबरोबरच मोदींनी पुतिन यांना भारत भेटीचे आमंत्रण देखील दिले.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत याबद्दल माहिती दिली आहे. "माझे मित्र राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी खूप चांगला आणि विस्तृत संवाद झाला. युक्रेनसंबंधी ताज्या घडामोडींबद्दल माहिती दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानले. याबरोबरच आम्ही आपसातील द्विपक्षीय अजेंड्याच्या प्रगतीचा आढावा देखील घेतला आणि भारत-रशिया ही खास आणि विशेष धोरणात्मक भागीदीरी आणखी दृढ करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या वर्षाच्या अखेरीस अध्यक्ष पुतिन यांचे स्वागत करण्यास मी उत्सुक आहे," असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या एक्सवर करण्यात आलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

याबरोबरच पंतप्रधान मोदींनी पुतिन यांना या वर्षाच्या अखेरीस वार्षिक द्विपक्षीय शिखर परिषदेसाठी भारतात येण्याचे आमंत्रण देखील दिले. दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा होण्याच्या आधी एका दिवसापूर्वी भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांन पुतिन यांची भेट घेतली होती. पुतिन आणि एनएसए अजित डोवाल यांची ही भेट क्रेमलिन येथे झाली.

ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादण्याचा निर्णय घेतल्यानंतर रशियाने भारताला पाठिंबा दर्शवला आहे. "सार्वभौम देशांना त्यांचे व्यापारी भागिदार स्वतः निवडण्याचा अधिकार आहे, असे क्रेमलिनचे प्रवक्ते दिमीत्री पेस्कोव्ह यांनी म्हटले आहे. तसेच इतर देशांना रशियाबरोबरचे व्यापारी संबंध तोडण्यास भाग पाडणे हे बेकायदेशीर आसल्याची टीका देखील त्यांनी अमेरिकेवर केली.

दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील ट्रम्प यांच्या टॅरिफवर प्रतिक्रिया देताना गुरुवारी शेतकरी, पशुपालक आणि मच्छीमार यांचे हित बाजुला ठेवून त्यांचे सरकार कधीही तडजोड करणार नाही. त्यासाठी वैयक्तिकरीत्या खूप मोठी किंमत मोजावी लागली तरी त्यास आपण तयार असल्याचे स्पष्ट केले.

www.pmfby.gov.in

**प्रधानमंत्री पीक विमा योजना**

UIN: IRDAN126RP0001V01201617

(भारत सरकार व महाराष्ट्र शासनाची योजना, एआयसी द्वारा लागू)

फसल बीमा कराओ सुरक्षा कवच पाओ

खरीप 2025

विविध नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे.
**खरीप हंगाम विमा योजनेतील पिके:** भात (धान), खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, तीळ, कारळे, कापूस व कांदा या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना भाग घेता येईल.



**महत्त्वाच्या बाबी**

- अंतिम मुदत: १४ ऑगस्ट २०२५
- योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याचा ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आणि ई पीक पाहणी बंधनकारक आहे.
- अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित पिके घेणारे सर्व शेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात.
- कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक आहे.
- ई पीक पाहणी व विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द होईल व भरलेला विमा हप्ता जप्त होईल.
- विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी विभागास रुपये ४० मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिले आहे. ते संबंधित विमा कंपनी मार्फत सीएससी विभागात दिले जाते त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी चालक यांना देऊ नये.
- एखाद्या अर्जदाराने बोगस किंवा फसवणूक करून विमा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना पुढील किमान पाच वर्ष काळ्या यादीत टाकून शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही.
- मंजूर नुकसान भरपाई अर्जदार यांचे आधार संलग्न बँक खात्यात थेट केंद्र शासन पोर्टलवरून जमा करण्यात येणार आहे.
- सर्व पिकांसाठी जोखीम स्तर ७० टक्के.

**उंबरठा उत्पादन**

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील सात वर्षातील सर्वाधिक उत्पादनाची पाच वर्षांच्या सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखीम स्तर विचारात घेऊन निश्चित केला जातो.

**विमा संरक्षणाच्या बाबी:**

पीक पेरणी पासून काढणी पर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक घटक कीड व रोगांचा प्रादुर्भाव इत्यादी कारणांमुळे पीक कापणी प्रयोगाद्वारे येणारे सरासरी उत्पादन हे त्या महसूल मंडळासाठीच्या उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास त्या महसूल मंडळामधील त्या पिकाचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना समप्रमाणात नुकसान भरपाई मिळणार आहे.

**विमा योजनेत सहभागी होण्याकरिता शेतकऱ्याने काय करावे?**

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यास या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. त्यासाठी शेतकऱ्याने विमा योजना भाग घेण्याच्या अंतिम दिनांक आधी किमान सात दिवस आधी संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे बाबत लेखी कळवणे गरजेचे आहे.

बिगर कर्जदार शेतकऱ्याने आपला ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, ७/१२ चा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड आणि पीक पेरणीचे स्वयंघोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज देऊन व हप्ता भरून सहभाग घ्यावा. याशिवाय कॉमन सर्विस सेंटर (सीएससी) च्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकता. भाग घेतलेल्या शेतकऱ्याने नंतर ई पीक पाहणी नोंद पूर्ण करावी

योजनेच्या माहितीसाठी संपर्क पीक विमा योजनेच्या अधिक माहितीसाठी किंवा नुकसान भरपाई माहितीसाठी केंद्र शासनाचे कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाइन १४४४७ वर संपर्क करावा, किंवा संबंधित विमा कंपनी प्रतिनिधि, स्थानिक कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा

| जिल्हे | विमा कंपनी |
| --- | --- |
| अहिल्यानगर, नाशिक, चंद्रपूर, सोलापूर, जळगाव, सातारा, वाशिम, बुलढाणा, सांगली, नंदुरबार, परभणी, वर्धा, नागपूर, नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, हिंगोली, अकोला, धुळे, पुणे, जालना, गोंदिया, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, भंडारा, पालघर, रायगड, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली | एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड |

अधिक माहितीसाठी QR Code स्कॅन करावा.



HO/25-26/1A/16

भारतीय कृषी बीमा कंपनी® | AGRICULTURE INSURANCE COMPANY OF INDIA LTD

मुंबई क्षेत्रीय कार्यालयः "लोक चेंबर्स", मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ | मुख्य कार्यालयः प्लेट B & C, ५ वा मजला, ऑफिस ब्लॉक १. ईस्ट किडवाई नगर, नवी दिल्ली-११००२३

ईमेल: pikvima@aicofindia.com, वेबसाईट: www.aicofindia.com | सीआयएनः U74999DL2002PLC118123, आयआरडीएआय: 126

aicofindialtd aicofindia aicofindia


*केवळ जाहिरात

कृषि रक्षक पोर्टल हेल्पलाइन १४४४७

* केवळ जाहिरात (योजनेच्या सर्व अटी व शर्ती लागू).

फसल हो या कृषि संपदा। बीमा सुरक्षा हमारा वादा ।।

विमा आग्रहाची विषय वस्तू आहे



## ➤ महत्त्वाचे

### मनपातर्फे विविध स्पर्धा संपन्न

**नाशिक ।** 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत मनपा शाळांमध्ये उत्साहात पोस्टर्स स्पर्धा, चित्रकला स्पर्धा संपन्न झाल्या. भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारत सरकारच्या 'हर घर तिरंगा' उपक्रमाचे




औचित्य साधून नाशिक महापालिका शिक्षण विभाग अंतर्गत सर्व शाळांमध्ये दि ५ ऑगस्ट रोजी पोस्टर्स स्पर्धा व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन श्रीम. करिष्मा नायर, अतिरिक्त आयुक्त नाशिक मनपा यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. मिता चौधरी, प्रशासन अधिकारी यांच्या सूचनेनुसार करण्यात आले होते. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त 'हर घर तिरंगा' हा उपक्रम संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या उपक्रमात नाशिक महापालिकेच्या शाळांनीही सक्रिय सहभाग नोंदवला असून, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. नाशिक महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये पोस्टर स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

### सरपंच पदाच्या आरक्षणांत जाती, जमातींवर अन्याय : गरुड

**मालेगाव ।** तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या ५ मार्च २०२५ ते ४ मार्च २०३० साठी सरपंच पदाचे आरक्षण काढताना तहसीलदारांनी अनुसुचीत



जाती व अनुसुचीत जमाती समाजावर अन्याय केला आहे. आरक्षण निश्चीत करतांना शासनाचे नियम धाब्यावर बसविण्यात आले आहेत, असा आरोप रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत गरुड यांनी जिल्हाधिकारी नाशिक यांना दिलेल्या निवेदनात केला आहे. आरक्षण काढताना अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमातीच्या एकूण बारा जागा सर्वसाधारण जागांमध्ये समाविष्ट करण्यांत आल्या आहेत. त्यामुळे मागासवर्गीय व दलित समाजावर अन्याय झाला आहे या घटकांना वंचित ठेवण्यांत आले आहे. तहसीलदारांनी मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील नियम ३,४,४अ, ५ व ६ या मधील तरतुदींचा भंग केला आहे. अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमातीच्या आरक्षणांत कुठलाही बदल करता येत नाही असे उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे निर्देश असतांना त्यांचा अवमान करण्यांत आलेला आहे. या संदर्भात कारवाई करावी अन्यथा आंदोलन छेडण्यांत येईल. तहसीलदारांनी अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमातीच्या आरक्षणांत दुरुस्ती करावी, अशी मागणी श्री. गरुड यांनी केली आहे.

### मानसिक-बौद्धिक खेळांद्वारे मेंदूच्या कार्यक्षमतेत वाढ : अमोल कुलकर्णी

**नाशिकरोड ।** परस्परावलंबन, परस्पर सहकार्य, समायोजन लक्षात घेण्याबरोबरच परस्पर सहसंबंध निकोप आणि आनंदाचे होण्यासाठी मानसिक विकासक खेळ गरजेचे आहेत. अशा मानसिक आणि बौद्धिक खेळांद्वारे मेंदूच्या कार्यक्षमतेत निश्चितच वाढ होते, असे प्रतिपादन प्रसिद्ध मानसविकास तज्ज्ञ अमोल कुलकर्णी यांनी




केले. शिखरेवाडीतील स्वानंद ज्येष्ठ नागरिक संस्था आणि मनोवेध डेव्हलपमेंट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने फाऊंडेशनचे अध्यक्ष अमोल कुलकर्णी यांचे विविध बौद्धिक आणि मानसिक खेळांची प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जयराम कुलकर्णी होते. उपस्थित ज्येष्ठांची तीन गटात विभागणी करण्यात आली आणि शारिरीक विशिष्ट हालचालींवर आधारित ज्येष्ठांच्या साखळीद्वारे पहिल्या ते शेवटच्या ज्येष्ठांपर्यंत योग रितीने पोहचले का? यांचे परीक्षण करून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. जंगलातील प्राणी, वनस्पती यांच्या सहाय्याने विविध मनोरंजनात्मक आणि समयसूचकतेसंबंधी माहिती देण्यात आली. कार्यक्रमाध्यक्ष जयराम कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात अशा उपयुक्त कार्यक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यासंबंधी मनोदय व्यक्त केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष सुनंदा गोसावी, सचिव अविनाश गोसावी, उपसचिव रवींद्र चंद्रात्रे, उपसचिव श्रीकांत मोहरील, उपखजिनदार परमेश्वर चिंतकिंदी, आधारस्तंभ वसंत उपासनी, अनिल सहस्त्रबुद्धे, सुधाकर सोनवणे, सी.आर.बोराडे, शास्त्री, ॲड.गोविंद पांडे, राम कुलकर्णी, शरद जोशी, रेखा जहागिरदार, मेखला रास्वळकर, शालिनी डहाळे, मृणाल प्रभुणे, कल्पना वैद्य, सुधा डमरे, वीणा जोशी, मंगल मोहरील, अर्चना सहस्त्रबुद्धे यांनी विशेष परिश्रम घेतले. माजी उपाध्यक्ष सुरेश पारुडेकर यांची विशेष उपस्थिती होती. सुधा कुलकर्णी यांनी त्रिवार ॐकार आणि गुरुवंदनेसह सूत्रसंचालन केले. वैजयंती चंद्रात्रे यांनी आभार प्रदर्शन केले.

# निसर्गाशी एकरूप झालेला आदिवासी समाज

जगभरात ९ ऑगस्ट हा आदिवासी विश्व दिन म्हणून साजरा केला जातो, ही आदिवासींच्या बाबतीत गौरवशाली बाब आहे. १९९३ मध्ये सर्वप्रथम जागतिक संघटनेने हा दिवस घोषित केला आणि खऱ्या अर्थाने तो २००४ पासून विविध राज्यात व देशभरात साजरा होऊ लागला. आपले अधिकार, आपली संस्कृती, जीवनपद्धती पूर्वकालापासून असणारे निसर्गाचे नाते, यातून त्याचे जगासमोर प्रदर्शन अशा अनेक छोट्या मोठ्या कार्यक्रमातून प्रदर्शन होऊ लागले. आता तर हा दिवस केवळ उसत्व म्हणून साजरा न होता तो एक मोठा सणाचा दिवस म्हणून आदिवासी समाज सर्वत्र साजरा करीत आहे. यात केवळ आदिवासीच नाही तर इतर जाती धर्माचे लोक सहभागी होऊन आदिवासी परंपरेची जाणीव आणि रीतिरिवाज आणि माहिती करून घेत आहे. परंतु अलीकडच्या काळात जो आदिवासी हजारो वर्षांपासून निसर्गाशी म्हणजे जल, जंगल, जमीनीशी नाते असणारा आदिवासी आता आपले मूळ तत्व विसरून तो काही दिवसातच देशोधडीला लागणार अशी चिन्हे सर्वत्र दिसू लागली आहेत. मुळातच इथला आदिवासी लवकर संपून त्याचा नायनाट व्हावा, अशी बहुतेक राजकर्ते आणि भांडवलदारांचे मत दिसते. मुळातच आदिवासींचे निसर्ग आणि पर्यावरणावरच जीवनमान अवलंबून आहे. आदिवासींचा निसर्गवाद म्हणजे काय? हे समजून घेणे महत्वाचे आहे. बऱ्याच वेळी आपण वाचतो, लिहीतो, ऐकतो की मुळातच जगातील आदिवासी हा निसर्गवादी आहे, मग निसर्गवाद आपण नेमकं कशाला म्हणतो. आदिवासी समाज बांधवांचे जीवन विषयक जगण्याची ओळख करून देणारा निसर्गवाद आहे. तो केवळ निसर्गाची जोडलेली श्रद्धा





किंवा पर्यावरणपूरक वागणूक नाही तर ती एक समाज व्यवस्था आर्थिक रचना आणि आध्यात्मिक दृष्टीकोन असून यावर आदिवासी समाजाचे जीवनमान अवलंबून आहे. निसर्गवाद हा या समाजाला नवीन दृष्टी आणि जगण्याची कला आत्मसाद करणारा आहे. विशेष म्हणजे आजच्या गतिमान युगात मानव हा त्याकडे फक्त हव्यास आणि आपले संसाधन म्हणून बघतो आहे. आदिवासी समाजाचे निसर्गाशी नाते अगदी प्रामाणिक असते. तो निसर्गाकडून घेतो पण आणि देतो पण. तो घेतो पण आपल्या हव्यासाने नाही, तर जंगलातील फळे वन औषधी, लाकूड व अन्य गौणसंपत्ती तो फक्त गरजेपुरते वापरतो. तो कुठल्याही वस्तूचा साठा न करता विक्रीही करत नाही. त्याचे हे जीवन स्वतः आणि समाजपुरते मर्यादित असून तो निसर्गसवर्धनाचे मूळ तत्व जाणून मर्यादा ओळखतो. जे निसर्गाने भरभरून दिले आहे, त्यातील बीजारोपन व्हावे म्हणून पुन्हा तो निसर्गाला अर्पण करतो. नवीन व मागील पिढीचा विचार करतो. आज सर्वत्र आधुनिक भांडवलशाहीची जणू स्पर्धाच लागली आहे. समाजातील मालकी हक्क हा वैयक्तिक असून त्याच्या या मालकी हक्कावर आज भांडवशाही व्यक्ती आणि मोठे राजकारणी, उद्योगपती यांच्या नजरा खिळून आहेत. त्यामुळे आज त्यांच्या मालकी हक्काच्या जमिनी काबीज करून तेथील जंगल नष्ट केले जात आहे. आज त्या ठिकाणी मोठं मोठे रिसॉर्ट व प्लॉटींग होऊन खेड्याची ओळख आता धुसर होऊन येथील जीवनमान आणि संस्कृती यावर कृत्रिम पेहराव परिधान केला आहे.एखादी नदी असो वा त्यातील दहाड त्या वरती साऱ्या गावचा हक्क असतो. अशा वेळी आदिवासी समाजाचा सण आला तर त्यातील मासे ते सर्वमिळून पकडतात व सर्वांना समान वाटणी केली जाते. काही अपरिहार्यतेमूळे एखादी व्यक्ती जरी आली नाही, तरी त्याचा वाटा घरपोच दिला जातो, अशी ही सामूहिक जगण्याची कितीतरी उदाहरणे आहेत. विशेष म्हणजे या सामूहिक व्यवस्थेमूळे निसर्गावर ताण येत नाही. आज अनेक भांडवलदार हजारो एकर जमीन घेऊन नफा कमविण्याच्या नादात निसर्गाचे अतोनात नुकसान करीत आहे, ही अतिशय खेदजनक बाब आहे. मुळातच आदिवासी समाज हा पूर्वांपार निसर्गावर अवलंबून असल्याने तो निसर्गालाच देव मानत आहे. झाडी, डोंगर, नद्या, प्राणी, वायू, अग्नी, अवकाश याची तो पूजा करतो. वनदेवता, भुमाता जलदेवता याच्याशी त्यांनी अगदी जिव्हाळ्याचे नाते जपले आहे. म्हणून त्याची तो पूजाअर्चा करतो. आदिवासी देवतांना कोंबडे, बकरा चालतात हे पण नाकारून चालणार नाही. त्याचे कारण असे आहे की, शहरातील लोकांसारखे रोज मटण, मासे मिळत नाही. त्या मुळे जर कधी त्याने देवाला कोंबडा, बकरा मारला तर तो काही एकटा खात नाही. एक प्रकारे सर्वांमिळून गावं जेवण असते. त्या सर्वच सामूहिक रीतीने ते वर्षातून किमान दोन वेळा तरी त्यांना मटण मांस खायला भेटते. यात सर्वच गांव अगदी मनापासून समाधानी असते. आदिवासींचे अन्न, वस्त्र निवारा हे सर्वच नैसर्गिक घटकांवर अवलंबून असते. त्यांचे सण, उसत्व ऋतुचक्राशी निगडित असतात. जेव्हा नवीन धान्य शेतातून येतं, तेव्हा ते आधी निसर्गदेवतेला प्रथम अर्पण केले जाते. त्यांची गाणी, नृत्य लोककला, लोकसंगीत हे सर्व निसर्गाच्या चक्राशी जोडलेल असते. आजच्या काळात इतक्या झपाट्याने हवामान बदल आणि बेछूट होणारी जंगल तोड, मोठ्या प्रमाणात होणारे जैवविविधतेचे नुकसान यामुळे संपूर्ण मानवजातीवर संकट आलं आहे. यातून मार्ग काढायचा असेल तर नुसती तांत्रिक उपाययोजना पुरेशी नाही. आपली विचारसरणी बदलायला हवी आणि त्यासाठी आदिवासी निसर्गवाद हा एक मार्गदर्शक विचार ठरू शकतो. अनेकदा विकासाच्या नावाखाली धरणे, खाणी, मोठे मोठे उद्योग, औद्योगिक क्षेत्र यामुळे आदिवासींचे विस्थापन होत आहे. त्यांचा निसर्गाशी असलेल्या नात्याला तडा जात आहे. निसर्ग हरवतो आहे आणि त्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होत आहे. या विकासाच्या संकल्पना निसर्गवादाच्या विरोधात आहेत. आदिवासींचा निसर्ग विचार महत्वाचा असला तरी जागतिक स्तरावर बहुतांश देशामध्ये आज भांडवली खाजगीकरणवादी सत्ता असल्याने आजच्या युगात आदिवासी समाज पूर्णतः लयास जाण्यापूर्वी जगाला हे समजून घावे लागेल. आदिवासी निसर्गवाद म्हणजे नुसते निसर्गावर प्रेम करायची भावना नव्हे, तर तो एक संपूर्ण जीवनपद्धती सांगणारे तत्वज्ञान आहे. तो निसर्गाशी संघर्ष न करता त्याच्याशी सुसंवाद साधण्याचा मार्ग आहे. आजच्या यांत्रिक, भौतिक व व्यवस्थावादी जगात ही जीवनदृष्टी म्हणजे एक प्रबोधनाचा किरण आहे. आदिवासीचा निसर्गवाद हा फक्त भूतकाळ नाही तर तो भविष्यासाठी दिशादर्शक आहे.

**- देवचंद महाले, आदिवासी कला, संस्कृती अभ्यासक व पर्यावरणवादी**
**(९८२२७३४५२४)**

## उमराळे खुर्द येथे परनॉर्ड रिकार्ड इंडिया फाऊंडेशन शिष्यवृत्ती मार्गदर्शन शिबिर संपन्न




**दिंडोरी ।** दिंडोरी तालुक्यातील उमराळे खुर्द या गावामध्ये परनॉर्ड रिकार्ड इंडिया फाउंडेशन यांच्या मार्फत शिष्यवृत्ती मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा उद्देश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती देऊन त्यांच्या उच्च शिक्षणासाठी योग्य मार्गदर्शन करणे हा होता.

या शिबिराला परनॉर्ड रिकार्ड इंडिया फाउंडेशनच्या सीएसआर हेड (इंडिया) अवंतिका सिंह यांनी उपस्थिती दर्शवली. त्यांच्यासमवेत सहकारी स्मृती, मोनिका आणि आरुषी यांचीही उपस्थिती होती. तसेच युथ ड्रिमर्स फाउंडेशनचे सीईओ सौरभ मेहरोत्रा हे देखील या वेळी उपस्थित होते आणि त्यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांचे प्रोत्साहन वाढवले. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना परनॉर्ड रिकार्ड इंडिया फाउंडेशन द्वारे दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची माहिती देण्यात आली. याशिवाय केंद्र व राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती योजनांबद्दल, तसेच खाजगी ट्रस्ट व एनजीओद्वारे दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक मदतीविषयी सविस्तर माहिती व मार्गदर्शन करण्यात आले. अर्ज प्रक्रिया, पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे याबाबत सखोल माहिती देण्यात आली. कार्यक्रमादरम्यान परनॉर्ड रिकार्ड इंडिया फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी उमराळे खुर्द गावातील शाळेला भेट देऊन शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याशिवाय गावातील शेतकऱ्यांशीही शेती व प्रशिक्षण विषयक संवाद साधला. फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी शिष्यवृत्ती लाभार्थ्यांच्या घरी भेट देऊन त्यांच्या परिस्थितीचे प्रत्यक्ष अवलोकन केले व पालकांशी संवाद साधून त्यांच्या शिक्षणावरील विश्वास वाढवला. या कार्यक्रमाचे आयोजन व समन्वय युथ ड्रिमर्स फाउंडेशनच्या टीमने केले. यामध्ये खुशाल सुतार, वैभव कदम, संकेत देशमुख, पंकज जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

## 'जैत रे जैत'च्या आठवणी..

आप्पासाहेब गो.नी. दांडेकर यांच्या जैत रे जैत कादंबरीवर आधारित जैत रे जैत चित्रपटाची निर्मिती उषाताई मंगेशकर व पं हृदयनाथ मंगेशकरांनी केली. ह्या निर्मितिला पन्नास वर्षे होत आहेत. त्या निमित्ताने पुण्यातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात चित्रपटातील आठवणी जागवल्या गेल्यात. पं.हृदयनाथ, डॉ. मोहन आगाशे, सतिश आळेकर, रविंद्र साठे, मृणाल कुळकर्णी,आदिंचा सहभाग होता. ह्या सगळ्यांनी त्या वेळेच्या आठवणी सांगीतल्या. रविंद्र साठे, विभावरी आपटे, मनिषा निश्चल, यांनी चित्रपटातील लोकप्रिय गाणी ऐकवली. ना.धो.महानोरांची सोळा गाणी यात आहेत. आणि पं.हृदयनाथ यांचे संगीत. गाणे आणि संगिताबरोबरीने पुढे पुढे जाणारा चित्रपट सुरुवातीला प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला नाही. पण नंतरच्या काळात, अनेक पारितोषिके मिळाली. गाणेही अतिशय लोकप्रिय झालीत. ग्रामीण भागात कलाकार एकरुप झाले, त्यामुळेच त्यात जिवंतपणा आला,आज ईतक्या वर्षानंतर ही



चित्रपट आठवणीत रहातो. पण आता याच्यापुढे असा चित्रपट आल्यास त्याला प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळेल का? याविषयी त्यांनी साशंकता व्यक्त केली. कार्यक्रमात जैत रे जैत चित्रपटाविषयी संपूर्ण माहिती असललेले "एक घोट मृगजळाचा" ह्या पुस्तका विषयावर स्वतः लेखिका विजयालक्ष्मी मणेरीकर (नाशिक) बोलल्यात.हे पुस्तक म्हणजे चित्रपटाविषयी,कथा,गाणी, संगीत, कलाकारां विषयावर सविस्तर लिहिले आहे. थोडक्यात पुस्तकातून चित्रपट डोळ्यासमोर उभा रहातो.

**- दिलीप देशपांडे.**
**मो. ८९९९५६६९१७**

# विणकर बांधवांना पेन्शन सुरू करण्यासाठी पाठपुरावा करणार : ना. छगन भुजबळ

**येवला ।** हातमाग उद्योग हा आपल्या इतिहासाचा, संस्कृतीचा आणि आत्मनिर्भरतेचा महत्वाचा भाग आहे. त्यादृष्टीने महायुती सरकारच्या वतीने विणकर बांधवांच्यांविकासासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहे. विणकर बांधवांसाठी विणकर समाज आर्थिक विकास महामंडळ या उपकंपनीची स्थापना केली आहे. या विणकर बांधवांना पेन्शन योजना सुरू करण्यासाठी आपण शासन स्तरावर पाठपुरावा करू, असे प्रतिपादन नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी केले.

येवला येथील आसरा लॉन्स येथे राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास मंत्री8 छगन भुजबळ यांनी उपस्थिती लावली. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे आयोजन राज्य वस्त्र उद्योग धोरण समितीचे सदस्य मनोज दिवटे यांनी केले. यावेळी प्रांत अधिकारी बाबासाहेब गाढवे, येवला नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे येवला विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, राज्य वस्त्र उद्योग धोरण समितीचे सदस्य मनोज दिवटे, जलचिंतन सेलचे जिल्हाध्यक्ष मोहन शेलार, मकरंद




सोनवणे, दिलीप खोकले, प्रा.प्रभाकर झळके, प्रवीण पहिलवान, श्रीनिवास सोनी, नंदकुमार नागपुरे, सुभाष पाटोळे, दिलीप केंद्रे, सुहास भांबारे,अविनाश कुक्कर यांच्यासह विणकर बांधव व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी भुजबळ म्हणाले की, १९०५ साली "स्वदेशी चळवळीला" सुरुवात झाली होती. ही चळवळ ब्रिटिशांच्या विदेशी वस्त्रांवर बहिष्कार टाकून, स्वदेशी कापड आणि हातमागावरील उत्पादनांना प्राधान्य देण्यासाठी सुरू झाली होती. आपला देश हा विविधतेने नटलेला आहे आणि या विविधतेचे एक महत्त्वाचे रूप म्हणजे आपला हातमाग उद्योग. आजही भारतात लाखो विणकर बांधव पारंपरिक कापड विणण्याचे काम करत आहेत. त्यांचे कौशल्य, त्यांचा मेहनतीचा वारसा आणि कलात्मकता हे सर्व भारताच्या संस्कृतीचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, महायुती सरकारने विणकरांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यास नेहमीच प्राधान्य दिले आहे. एकात्मिक व शास्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३ -२०२८ अंतर्गत हातमाग विणकरांना उत्सव भत्ता देण्यात येत आहे. यामध्ये पुरुष विणकर यांना प्रति पूरूष दहा हजार रुपये तर महिला विनकर यांना प्रति महिला विणकर पंधरा हजार रुपये उत्सव भत्ता दिला जात आहे. पारंपारिक विणकरांचे सर्वेक्षण करून त्यांना केंद्र शासन आणि राज्य शासनाकडे नोंदणी करून ओळखपत्र देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, देशात शेती खालोखाल जर कुठला

### राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त...

प्रमुख व्यवसायात असेल तर त्यात विणकर वस्त्रोद्योगाचा समावेश आहे. प्रामुख्याने येवल्यात मोठ्या प्रमाणात विणकर आहेत. सन २००४ साली येवल्यात पैठणीचे फक्त तीन दुकाने होती. आता सुमारे ४०० हून अधिक दुकाने सुरु आहे. यातून पैठणी विणकरांना मोठा रोजगार उपलब्ध झाला आहे. प्रभू रामचंद्राच्या पदस्पर्शाने नाशिक, साईबाबांच्या रूपाने शिर्डी तर पैठणीचा विकास झालेला येवला हा पर्यटनाचा सुवर्ण त्रिकोण तयार झाला असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, वस्त्रोद्योग हा येवल्यात मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे या व्यवसायाशी आपला जवळचा संबंध असून विणकरांच्या प्रश्नांची आपल्याला जान आहे. त्यांचे हे प्रश्न सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. नुकतेच "पैठणी कलाकारी क्लस्टर येवला येथे १२ कोटी २३ लाख रुपयांच्या सामाईक सुविधा केंद्रासाठी (कॉमन फॅसिलिटी सेंटर) राज्य शासनाकडून अंतिम मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पाअंतर्गत याठिकाणी वॉर्पिंग, रेशीम वळवण्याची सुविधा, रेशीम धागा रंगवणे, वाइंडिंग, उत्पादन डिझाइनिंग केंद्र, मूल्यवर्धन केंद्र, उत्पादन चाचणी सुविधा उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, हे सेंटर पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर पुढील पाच वर्षात विक्रीत १०८०.६८ कोटी रुपयांवरून वाढ होऊन ती १७२८.२० कोटी एवढी होईल. क्लस्टरच्या उत्पादकतेत ६५% वरून ९०% पर्यंत वाढ होईल. रोजगारात ३७८ वरून ९४९ पर्यंत वाढ होईल. नफ्यात २१६.१४ कोटी वरून ३४५.६४ कोटी पर्यंत वाढ होईल तसेच निर्यातीत ० वरून ८-१० कोटी पर्यंत वाढ होणार आहे.

या प्रकल्पामुळे पैठणी वस्त्र उद्योगाला अधिक चालना मिळेल, रोजगाराच्या संधी वाढतील आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थान मिळवण्याचा मार्ग सुकर होईल. तसेच हे CFC सेंटर सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अनुसूचित जाती जमाती आणि महिला उद्योजकांनाही मदत करणार असून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे येवल्यासह संपूर्ण नाशिक जिल्ह्यातील वस्त्रोद्योगात क्रांती होणार आहे.

# सिव्हिलच्या लाडक्या ठेकेदाराला 'संदर्भ' रुग्णालयाचा झटका!

## निकृष्ट उपकरणांचा पुरवठा; 'संदर्भ'ने रद्द केले कोट्यवधींचे कंत्राट






**नाशिक ।** सिव्हिल हॉस्पिटलमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून मोकाट वावरणाऱ्या आणि सतत वादग्रस्त ठरलेल्या लाडक्या ठेकेदारावर अखेर संदर्भ सेवा रुग्णालयाने कडक कारवाई करत कोट्यवधी रुपयांचे जीईएम पोर्टल अंतर्गत दिलेले कंत्राट रद्द केल्यामुळे खळबळ उडाली आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरुण पवार यांनी तज्ञ समितीच्या अहवालाच्या आधारे हा निर्णय घेतला असून, संबंधित ठेकेदाराने पुरवलेली उपकरणे ही निकृष्ट आणि निविदेतील तांत्रिक अटींच्या विरोधात असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

संदर्भ सेवा रुग्णालयाने जीईएम पोर्टलच्या माध्यमातून विविध वैद्यकीय उपकरणांची खरेदी करण्यासाठी आदेश निर्गमित केला होता. यावेळीच ठेकेदाराचा 'आका' संबंधित कार्यालयात कार्यरत असल्याचीही जोरदार चर्चा होती. त्यानंतर वैद्यकीय अधीक्षकांच्या आदेशानुसार तज्ञ डॉक्टर आणि जीववैद्यकीय अभियंत्यांनी उपकरणांची सखोल तपासणी केली असता, ती उपकरणे निविदेतील अटींच्या विपरीत आणि निकृष्ट दर्जाची असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे संबंधित उपकरणे त्वरित परत नेण्याचे निर्देश देण्यात आले असून, एकही रुपयाचे देयक अदा न करण्याचा निर्णय घेतला गेला आहे.

या ठेकेदाराला यापूर्वी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये औषध खरेदी, ऑपरेशन थिएटर, प्रसूतिगृह बांधकाम अशा अनेक महत्वाच्या कामांची कंत्राटे मिळालेली आहेत. विशेष म्हणजे, ऑपरेशन थिएटरचे काम अद्यापही अपूर्ण असूनही त्याबाबत कोट्यवधींचे बिल अदा करण्यात आले आहे. औषधांच्या दरांमध्ये संदर्भ सेवा रुग्णालय आणि सिव्हिल हॉस्पिटल यांच्यातील मोठ्या तफावतीने ठेकेदाराच्या भामटेपणाचा पर्दाफाश आधीच झाला होता.त्याच ठेकेदाराला एचएएलने ब्लॅकलिस्ट केल्याची बाब देखील 'महासागर'ने पूर्वी उघड केली होती. तरीदेखील शासनाची दिशाभूल करत, जीईएम प्रणालीचा आधार घेत हा ठेकेदार दरवेळी कंत्राटं मिळवतो, यामागे कोणाचा वरदहस्त आहे, याबाबत सिव्हिल हॉस्पिटल मध्ये उलट सुलट चर्चा सुरू आहे.

> सिव्हिल हॉस्पिटल आणि संदर्भ सेवा रुग्णालयात सुरू असलेल्या गैरव्यवहाराचा 'महासागर'ने वेळोवेळी भंडाफोड केली आहे. विविध कंत्राटे त्यातील गोंधळ, औषध पुरवठ्यांतील तफावत, निकृष्ट उपकरण पुरवठा अशा सर्वच प्रकारात भ्रष्ट यंत्रणेचा बुरखा फाटला आहे.मात्र, या सगळ्या प्रकारात उपसंचालक कार्यालय मात्र अद्यापही मौन धारण करून आहे. त्यामुळे "सिव्हिल हॉस्पिटलमध्ये गंभीर गैरव्यवहार सुरू असताना उपसंचालक कार्यालय अस्तित्वात आहे का?" असा सवाल उपस्थित होतो आहे. त्यामुळे या सर्वच बाबींना जबाबदार धरत उपसंचालकांवरही कारवाई करावी, अशी जनतेमध्ये मागणी तीव्र होत आहे.

जीईएम पोर्टलच्या नियमांनुसार ३० दिवसांत उपकरणांचा संपूर्ण पुरवठा करणं बंधनकारक होते. मात्र, ठेकेदाराने मनमानी करत वेळेवर पुरवठा केला नाही. याची गंभीर दखल घेऊन, संबंधित पत्रात भविष्यातही या ठेकेदाराने कोणताही पुरवठा करू नये, असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे.

संदर्भ सेवा रुग्णालयाने जरी ठोस भूमिका घेत ठेकेदाराला नकार दिला असला, तरी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मात्र त्याला अक्षरशः पायघड्या घातल्या जात आहे. प्रत्येक मोठ्या प्रकल्पाचे कंत्राट मिळवणाऱ्या या ठेकेदाराच्या उपकरणांबाबत आता सिव्हिल हॉस्पिटलमध्येही संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे तज्ञ समितीकडून याची स्वतंत्र तपासणी करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

या प्रकरणावर सिव्हिल सर्जन काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विभागीय स्तरावर ज्या पद्धतीने लाडक्या ठेकेदाराला संरक्षण दिलं गेलं, त्या मुळे आरोग्य विभागाच्या प्रशासकीय पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. ठेकेदाराचे बेकायदेशीर कृत्य आता उघड होत असताना, सिव्हिल सर्जन त्याच्यावर कोणती कारवाई करणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

# माहिती अधिकारात टाळाटाळ; सिव्हिल सर्जन डॉ. शिंदे यांच्यावर कारवाईची मागणी



**नाशिक ।** सिव्हिल हॉस्पिटलमध्ये सुरू असलेल्या गैरप्रकारांबाबत माहिती अधिकार कायद्यानुसार मागवलेली माहिती न देता, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देत अर्जदारास त्रास देणाऱ्या सिव्हिल सर्जन डॉ. चारुदत्त शिंदे यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी लोक आंदोलनचे जिल्हाध्यक्ष निशिकांत पगारे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. पगारे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सिव्हिल हॉस्पिटल प्रशासनाकडे माहिती अधिकारात मागितलेली माहिती नागरिकांना न दिल्याच्या आणि दिली तरी ती चुकीची असल्याच्या अनेक तक्रारी लोक आंदोलनकडे प्राप्त झाल्या होत्या. याची खातरजमा करण्यासाठी त्यांनी स्वतः माहिती अधिकार कायद्यान्वये अर्ज केला. मात्र त्यांना देखील चुकीची माहिती देण्यात आली, त्यामुळे त्यांनी अपील दाखल केले.अपीलच्या सुनावणीच्या दिवशी स्वतः सिव्हिल सर्जन अनुपस्थित राहिले आणि अर्जदाराला कोणतीही पूर्वकल्पना दिली नाही. दुसऱ्या सुनावणीस अर्जदार व अपिलीय अधिकारी उपस्थित होते, मात्र काही वेळातच अपिलीय अधिकारी कोणतेही स्पष्टीकरण न देता निघून गेले व पुन्हा परतलेच नाहीत. दिनांक २४ जुलै २०२५ रोजी सादर करण्यात आलेल्या उत्तरात डॉ. शिंदे यांनी गैरहजेरी मान्य केली आहे. या साऱ्या प्रकारामुळे डॉ. शिंदे हे अपिलाच्या प्रक्रियेला वारंवार चुकवत असून अर्जदारास जाणूनबुजून त्रास देत आहेत. त्यामुळे त्यांच्यावर माहिती अधिकार कायद्यान्वये कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पगारे यांनी विभागीय आयुक्तांकडे केली आहे.

> सिव्हिल हॉस्पिटल मध्ये सुरु असलेले गैरप्रकार उघडकीस येण्यासाठी माहिती अधिकारात अर्ज केला, मात्र हॉस्पिटल कडून दिशाभूल करणारी खोटी माहिती मिळाली त्यानंतर डॉ.चारुदत्त शिंदे यांच्याकडे अपील सुरू होते. मात्र शिंदे यांना माहिती अधिकाराचे गांभीर्य नसल्याने अद्याप माहिती मिळाली नाही त्यानुसार विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम तसेच जिल्हाधिकारी,आरोग्य उपसंचालक आणि लोक आंदोलन न्यासचे अध्यक्ष अण्णा हजारे यांच्याकडे तक्रार दिलेली आहे.
>
> **– निशिकांत पगारे, जिल्हाध्यक्ष, लोक आंदोलन न्यास**



> संबंधित तक्रारदाराचा अर्ज वाचल्यानंतर माहिती अधिकारानुसार त्यांना संपूर्ण माहिती आठ दिवसात विनामूल्य देण्यात यावी असे आदेश संबंधित जन माहिती अधिकारी यांना देण्यात आले आहेत.मात्र तक्रारदार यांना अद्याप माहिती न मिळाल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करणार
>
> **– डॉ. चारुदत्त शिंदे, सिव्हिल सर्जन**


### सिव्हिल हॉस्पिटलमधील भ्रष्टाचाराची माहिती दडपली जात आहे का?

माहिती अधिकारात वारंवार टाळाटाळ, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देणे, अपिल प्रक्रियेकडे दुर्लक्ष आणि नागरिकांना त्रास देण्याच्या आरोपांमुळे सिव्हिल सर्जन डॉ. चारुदत्त शिंदे यांच्यावर कारवाईची मागणी. या सर्व प्रकारामुळे सिव्हिल हॉस्पिटलमधील गैरप्रकारांची माहिती जाणीवपूर्वक दडपली जात असल्याचा संशय नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. त्यामुळे या तक्रारीची गांभीर्याने चौकशी होणे गरजेचे असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.

# स्वामी समर्थ पादुकांचे उद्या नाशकात आगमन

**नाशिक ।** अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थांचे मुख्य भक्त चोळाप्पा महाराज यांच्याकडील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पादुकांचे रविवारी दिनांक 10 रोजी आगमन होणार आहे.

यावेळी चोळाप्पा महाराजांचे चौथे वंशज योगेंद्र पुजारी हे उपस्थित राहणार आहेत. श्री स्वामी समर्थांच्या पादुकांचे आगमन अंकुर अपार्टमेंट, माणेकशानगर, काठे गल्ली, द्वारका येथे सकाळी आठ वाजता होणार असून श्रींच्या पादुकांचे अभिषेक पूजन सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत होणार आहे. त्यानंतर महाआरती आणि महाप्रसाद वाटपाचा मुख्य कार्यक्रम दुपारी १२ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत राहणार आहे. यादरम्यान भजनाचा कार्यक्रम होणार आहे स्वामींच्या पादुकांचे प्रस्थान सायंकाळी साडेसात वाजता होणार आहे भाविकांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन सुचिता पाठक व ब्राह्मण महासंघाचे शहराध्यक्ष भगवंत पाठक यांनी केले आहे.



# रायझिंग सिंगर्स प्रस्तुत 'ये दोस्ती हम नही तोडेंगे' सांगितिक मेजवानीत रसिक दंग...

**नाशिकरोड ।** " अब मुझे रात दिन, दोनोने किया था प्यार मगर, तेरे जैसा यार कहा, मनाच्या धुंदीत, माळ्याच्या मळ्यामधी कोण गं उभी, झीलमील सीतारोका आंगन, ओले ओले, ये दोस्ती हम नही, तुझे देखा तो ये जाना सनम, कान्हा सो जा जरा," अशी एक से गाणी कलाकारांनी सादर करीत रसिकांना मंत्रमुग्ध केले.

निमित्त होते नाशिक इंदिरानगर येथील रायझिंग सिंगर्स कराओके ग्रुप प्रस्तुत रुपेश शिंपी आयोजित 'ये दोस्ती हम नही तोडेंगे' या सदाबहार सुमधुर मराठी, हिंदी गीतांची संगितमय कार्यक्रम इंदिरानगर येथील स्वर्णिमा हॉल येथे बुधवार दि. ६ ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या व रसिकांच्या उपस्थितीत उत्साहात सम्पन्न झाला . या संगीतमय मैफिलीत रायझिंग सिंगर्स ग्रुपचे कलाकार यांनी विविध गाणी सादर केली . यात स्वतः रुपेश शिंपी यासह विनोद साखरे, प्रकाश महाले, संजय परमसागर, धनंजय भावसार, अँथोनी सरदार, हेमंत अहिरराव, दिपाली मिस्त्री, रूपाली नागरे, नूतन मिस्त्री, योगिता गोसावी, जयश्री माळी, निवेदिता कस्तुरे, सुनील मिस्त्री, संदीप सोनवणे, विलास गोसावी या गायकांनी एक से एक विविध गीते सादर केली. या गाण्यांचा आनंद घेत रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उस्फुर्त दाद दिली. प्रारंभी मान्यवर श्री सुभाष व सौ. सुशीला शिंपी, सुनिल सोनवणे, कुलकर्णी काका शरद सोनवणे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. रायझिंग सिंगर्स ग्रुप वतीने हा तिसरा कार्यक्रम आयोजित होत असून विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात यात ` वृक्ष लावा वृक्ष जगवा, कापडी पिशव्या वाटप तसेच वृद्धाश्रमास, गरीब होतकरू विद्यार्थ्यास व दिव्यांग बंधूस तसेच अक्षय फाउंडेशनला मदत असे विविध उपक्रम ग्रुप तर्फे राबवले जात असल्याची माहिती संयोजक रुपेश शिंपी यांनी दिली. या कार्यक्रम व उपक्रमांसाठी नितीन जगदाळे व सौ. माधुरी शिंपी यांनी मोलाचे सहकार्य केले. सौ. रोहिणी सोनार यांनी खुमासदार काव्यशैलीत सूत्रसंचालन करून रसिक श्रोत्यांना खीळवून ठेवले. श्री. पवन रोकडे यांनी ध्वनीसंयोजन केले.



# मनमाड कृउबा सभापती विरोधात अविश्वास ठराव बारगळला

## विरोधकांकडे १२ मतांचे बहुमत नाही

**मनमाड ।** गेल्या अनेक महिन्यापासून मनमाड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सत्ताधारी गट आणि विरोधी गटात संघर्ष सुरू असून सभापती दिपक चंद्रकांत गोगड यांच्या विरोधात विरोधी गटाच्या बारा सदस्यांनी दाखल केलेला अविश्वास ठराव अकरा विरुद्ध शून्य मतांनी नामंजूर करण्यात आल्याने अविश्वास ठराव बारगळला. ठराव मंजूर करण्यासाठी १२ मतांचे बहुमत पाहीजे होते. अविश्वास ठरावाच्या बाजूने ११ तर अविश्वासाच्या विरोधात शून्य मते मिळाली. यावेळी बाजार समितीच्या विरोधी गटाचे ११ सदस्य उपस्थित होते. तर सत्ताधारी एकही संचालक उपस्थित नव्हता. प्रांताधिकारी बाबासाहेब गाढवे यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिपक गोगड हे मनमानी पद्धतीने कामकाज करतात, कामकाज करण्यासाठी ते कार्यालयात येत नाही, सर्व कामे घरी बसून आणि बेकायदेशीरपणे करतात असा आरोप करत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विरोधी आघाडीच्या १२ संचालकांनी अप्पर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे यांच्याकडे सभापती गोगड यांच्या विरोधात अविश्वास ठराव लेखी स्वरूपात मांडला. दरम्यान गेल्या सहा महिन्यापासून परस्पर विरोधी राजकारण व बाजार समितीच्या कथेत कायदेशीर बेकायदेशीर बैठकांची पडघम राज्यभर गाजले. मुंबई उच्च न्यायालयापर्यंत हे प्रकरण गेले. अखेर विरोधी आघाडीच्या बारा संचालकांनी १८ जुलै रोजी अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे सभापती गोगड यांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव मांडला आणि त्यावर विचार विनिमय करण्यासाठी शुक्रवारी सकाळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. प्रांत अधिकारी बाबासाहेब गाढवे हे अध्यासन अधिकारी म्हणून उपस्थित होते.त्यांच्या अध्यक्षतेखाली अविश्वास ठरावावर चर्चा करण्यासाठी सभा सुरू झाली. प्रारंभी अध्यक्ष अधिकारी गाढवे यांनी जिल्हाधिकारी यांचा आदेश वाचून दाखवला. विद्यमान सभापती हे संचालकांना विश्वासात घेत नाही, मनमानी कामकाज करतात, घरी बसून काम करतात, उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न नाही, त्यामुळे बाजार समितीचे मोठे नुकसान झाले आहे. असा आक्षेप करत हा विश्वास ठराव मांडण्यात आला. त्यानंतर माजी आमदार व बाजार समितीचे विद्यमान संचालक संजय पवार यांनी अविश्वास ठराव का मांडला याबाबत मनोगत व्यक्त केले. कृषी उत्पन्न बाजार समिती ही नाशिक जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी बाजारपेठ आहे.



### असा फेटाळला गेला अविश्वास ठराव

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एकूण १८ संचालक असून एका संचालकाचे संचालक पद रद्द करण्यात आले आहे. पात्र संचालक १७ आहेत. विद्यमान सभापतींच्या विरोधात अविश्वास ठराव मंजूर करण्यासाठी दोन तृतीयांश बहुमत आवश्यक असते. आजच्या सभेला संचालक रमेश कराड यांना उच्च न्यायालयाने बैठकीमध्ये सहभाग घेण्यास मनाई केल्यामुळे विरोधी आघाडीचे फक्त ११ संचालक राहिले. त्यामुळे अविश्वास ठरावाच्या बाजूने दोन तृतीयांश बहुमत होऊ शकले नाही. बारा सदस्य संख्या आवश्यक असताना विरोध अविश्वास ठरावाच्या बाजूने ११ सदस्यांनीच मतदान केले.त्यामुळे अविश्वास प्रस्ताव फेटाळण्यात आला.

परंतु विद्यमान सभापती मनमानी काम करतात, संचालकांना विश्वासात घेत नाही, वेळोवेळी सांगून देखील संचालक मंडळाची बैठक घेत नाही, बाजार समितीचे कामकाज विस्कळीत झाले आहे. समितीचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. बाजार समितीच्या हिताला बाधा पोहचत असल्याने अविश्वास ठराव आणला असून तो मंजूर करावा अशी मागणी केली. तसेच बाजार समितीचे ज्येष्ठ संचालक गंगाधर बिडगर, किशोर लहाने, कैलास भाबड यांनी देखील अविश्वासा ठरावाबाबत मनोगत व्यक्त केले. अध्यासन अधिकारी बाबासाहेब गाढवे यांनी अविश्वास ठराव मतदानासाठी घेतले असता अविश्वास ठरावाच्या बाजूने उपस्थित अकरा सर्व ११ संचालकांनी हात वर करून मतदान केले. तर अविश्वास ठरावाच्या विरोधी बाजूने निरंक मतदान झाले म्हणजे विरोधी आघाडीच्या अकरा सदस्यांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केले तर सत्ताधारी संचालक कोणीही उपस्थित नसल्याने त्यांची आकडेवारी निरंक राहिली आणि अकरा विरुद्ध शून्य अशा मतांनी हा अविश्वास ठराव फेटाळण्यात आला. दरम्यान या विशेष सभेला संचालक संजय पवार, किशोर लहाने, विठ्ठल आहेर, कैलास भाबड, दशरथ लहिरे, सुभाष उगले, आप्पा कुनगर, संगीता कराड, चंद्रकला डघळे, ॲड. गंगाधर बिडगर, मधुकर उगले असे अकरा संचालक उपस्थित होते. तर सत्ताधारी गटाचे कोणीही उपस्थित नव्हते. प्रांताधिकारी बाबासाहेब गाढवे आणि बाजार समितीचे सचिव बी.एल. गायकवाड यांनी सभेचे संयोजन केले. या सभेला बाजार समिती परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मनमाड विभागाचे पोलीस उपाधीक्षक बाजीराव महाजन, शहर पोलीस निरीक्षक विजय करे जातीने उपस्थित होते.

### बाराव्या संचालकाला सभा, मतदान करण्यास मनाई

अविश्वास ठरावावर चर्चा करण्यासाठी शुक्रवारी बैठक आयोजित केली असली तरी गुरुवारी या एकूणच सर्व प्रकरणाला मोठी कलाटणी मिळाली. विद्यमान सभापती दिपक गोगड यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आणि अपील दाखल केले होते. त्या अपीलाचा निर्णय गुरुवारी सायंकाळी सभापतींच्या बाजूने लागला. बाजार समितीमध्ये नव्याने निवडून आलेले संचालक रमेश कराड यांना शुक्रवारी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये बैठक प्रक्रियेत आणि मतदानात सहभागी होता येणार नाही असा महत्त्वपूर्ण निर्णय उच्च न्यायालयाने दिला. या संदर्भात सभापती दिपक गोगड आणि गणेश धात्रक यांनी न्यायालयात अपील केले होते. अपीलकर्त्यां तर्फे ॲड. सुधाकर मोरे यांनी बाजू मांडली आणि या निकालामुळे शुक्रवारी असलेल्या अविश्वास ठरावावरील चर्चेची हवाच निघून गेल्याची सत्ताधाऱ्यांचे म्हणणे आहे. रमेश कराड यांची मनमाड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक म्हणून १८ जुलै रोजी झालेल्या सभेत एकमताने निवड करण्यात आली. या सभेलाही विद्यमान सत्ताधारी संचालक उपस्थित नव्हते. त्यांच्या या निवडीच्या विरोधातही अपील दाखल केलेले आहे. त्यामुळे त्यांना शुक्रवारच्या सभेत सहभागी होण्याचा आणि मतदान करण्यास न्यायालयाने मनाई केल्याने याचा परिणाम अविश्वास ठरावावर मोठ्या प्रमाणावर झाला.

> आपल्या विरोधात अविश्वास ठराव फेटाळण्यात आला ही विरोधकांना एक जबरदस्त सूचना आहे. यापुढे शेतकरी हितासाठी आम्ही लढत राहू. चांगले निर्णय घेऊ केवळ राजकारण म्हणून विरोध न करता सर्वांनी एकजुटीने शेतकरी हितासाठी काम करावे आणि त्यासाठी विरोधक सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे.
>
> **– दीपक गोगड, सभापती, कृउबा**

> भाजपचे सर्व वरिष्ठ नेते आणि पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल मी आभार मानतो. अशा अटीतटीच्या वेळी पक्षाने पदाधिकाऱ्याने मोठे मदत केले आणि बाजार समितीमध्ये शेतकरी हिताची आणि विकासाचे काम करत असताना विरोधकांनी यापुढे मदत करावी. ही बाजार समिती टिकली पाहिजे असे आमचे प्रयत्न असून त्याला साथ द्यावी आणि चांगले काम करत असताना तुम्हाला बहुमताची गरज काय आहे?
>
> **– गणेश धात्रक, संचालक, कृउबा**

> आमच्याकडे १२ संचालकांचे बहुमत आहे. तर विरोधक हे फक्त नामधारी आहेत. पण शेतकरी हिताची कामे यापुढे आम्ही करू आणि त्यासाठी आम्ही लढा देऊ.
>
> **– किशोर लहाने, संचालक, कृउबा**

# विध्वंसाचे दुसरे नाव धराली





धराली येथील रहिवासी आकाश पंवार फक्त ३२ वर्षांचे होते. ५ ऑगस्ट रोजी त्यांनी काही मित्रांना घरी बोलावले. आकाश यांची आई कामेश्वरी देवी आणि कुटुंबातील इतर सदस्य जवळच्या हर दुधा मेळ्याला गेले होते. धराली शहर डोंगराच्या पायथ्याशी वसलेले आहे. अचानक वरून पाण्यासोबत चिखल-गाळ वाहू लागला. आवाज ऐकून आकाशने त्याची स्कूटर सुरू केली. तो स्कूटर वळवत असतानाच चिखलाचा प्रचंड मोठा लोंढा त्याच्या घरापर्यंत पोहोचला. आकाशच्या डोक्यावर एक दगड लागला आणि तो तिथेच मरण पावला.

----------------

उत्तराखंडमधील धराली येथे भूस्खलनामुळे झालेल्या विध्वंसानंतर ५० हून अधिक बेपत्ता लोकांचा शोध सुरू आहे. तथापि, धरालीतील लोक सांगत आहेत की किमान १५० लोक ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची शक्यता आहे. एकूण ५ जणांचा मृत्यू झाला आहे, त्यापैकी फक्त आकाशचा मृतदेह सापडला आहे. एसडीआरएफ, आयटीबीपी, पोलिस आणि प्रशासन बचावकार्यात गुंतले आहे. धरालीतील लोकांना माटली येथील आयटीबीपी कॅम्पमध्ये आणले जात आहे.

आकाश धराली येथे एक हॉटेल चालवत होते. त्यांची आई कामेश्वरी देवी आणि कुटुंबातील इतर सदस्य आयटीबीपी कॅम्पमध्ये आहेत. त्यांना येथे एअरलिफ्ट करण्यात आले. मुलाच्या मृत्यूपासून त्यांची तब्येत ठीक नाही. त्या बोलण्याच्या स्थितीत नाहीत.

कामेश्वरी देवींच्या परिसरात राहणाऱ्या रजनी कुक्रेती त्यांची काळजी घेत आहेत. रजनी यांनीही धराली उद्ध्वस्त होताना पाहिले आहे. तेव्हापासून त्या कामेश्वरी देवींसोबत आहेत. रजनी म्हणतात, 'आकाशसोबत काही मित्र आणि गावकरी होते. आतापर्यंत फक्त आकाशचा मृतदेह सापडला आहे. काही सेकंदांच्या विध्वंसाने धारालीतील सर्व काही उद्ध्वस्त झाले.' धरालीमध्ये अजूनही अनेक लोक गाळाखाली दबले आहेत. त्यांच्या जगण्याची आशा फार कमी आहे.

धराली हे साधारणतः १ हजार लोकवस्तीचे गाव. गंगोत्रीला जाणारा मार्ग येथूनच जातो. तीन दिवसांपूर्वीच्या ढगफुटीनंतर महाप्रलय आला आणि होत्याचे नव्हते झाले. संपूर्ण गाव पाणी आणि त्याबरोबर वाहून आलेल्या मलब्याखाली गाडले गेले. भगवान नामक इसमाचे ४० खोल्यांचे हॉटेल होतं. संपूर्ण इमारत उद्ध्वस्त झाली. दुसऱ्यांदा जेव्हा लोंढा आला तेव्हा त्यांची बाग वाहून गेली. काहीही शिल्लक राहिले नाही. येथील कुणालाही कधीच वाटलं नव्हतं की अशी आपत्ती येईल आणि एका मिनिटात त्यांचे मोठे गाव गाडले जाईल.'

या आपत्तीनंतर 'किमान १५० लोक बेपत्ता आहेत. ते आता वाचणार नाहीत. इतक्या चिखलात कोण वाचले असेल? असा प्रश्न गावकरी विचारत आहेत. गावकरी, व्यापारी, कामगार, कोणीही सापडले नाही. घरे, दुकाने, बाजारपेठा, मंदिरे, बागा, शाळा, सर्व काही गाडले गेले. महाप्रलयाचा व्हिडिओ बनवणाऱ्या व्यक्तीने सांगितले की त्याने त्याच्या समोर लोकांना मरताना पाहिले

धराली गावाच्या दुसऱ्या बाजूला, समोरच्या डोंगरावर मुखवा गाव आहे. धराली येथील भूस्खलनाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. यामध्ये डोंगरावरून पाणीमिश्रित गाळ वाहताना दिसत आहे. त्यानंतर अचानक चिखल आणि दगडांचा लोंढा येतो. धराली येथील विध्वंसाची तीव्रता या व्हिडिओवरून दिसून येते. अपघाताच्या वेळी धरालीमध्ये उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने हा व्हिडिओ बनवला आहे. यामध्ये धरालीचा संपूर्ण बाजार गाळाखाली गाडलेला दिसत आहे.

संयोगिता नामक एक महिला सांगते, 'संपूर्ण जगाने पाहिलेला व्हिडिओ माझ्या भावाने बनवला होता. आम्ही जोरात शिट्ट्या वाजवत होतो आणि लोकांना पळून जाण्यास सांगत होतो. सगळं खूप धोकादायक होतं. मी लोकांना मरताना पाहिले. कोणालाही काहीही करण्याची किंवा पळून जाण्याची संधी मिळाली नाही.'

ती सांगते, 'मी धरालीतील ८ जणांना ओळखत होते. मी कोणाशीही संपर्क साधू शकत नाही. गेल्या ५ दिवसांपासून वीज, मोबाईल नेटवर्क, इंटरनेट नाही. हर्षिल आणि धराली दरम्यानच्या हेलिपॅडमध्ये एक तलाव तयार झाला आहे. हा तलाव आमच्या घराच्या मागे तयार झाला आहे.'

उत्तरकाशी जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ८ किमी अंतरावर असलेल्या माटली येथील आयटीबीपी कॅम्पला बचाव केंद्र बनवण्यात आले आहे. धारली आणि हर्षिल येथून लोकांना एअरलिफ्ट करून येथे आणले जात आहे. राज्य आणि केंद्रीय एजन्सी येथे तैनात आहेत. पोलिसांनी त्यांचे कॅम्प उभारले आहेत. आरोग्य विभागाने सुटका केलेल्या लोकांच्या तपासणी आणि उपचारांसाठी एक कॅम्पदेखील उभारला आहे. येथून, बचाव पथकाला लहान गटात धराली येथे पाठवले जात आहे.

ज्या लोकांना वाचवून आयटीबीपी कॅम्पमध्ये आणले जात आहे त्यांची यादी तयार केली जात आहे. त्यांची संपूर्ण माहिती लिहून ठेवली जात आहे.

ज्यांचे कुटुंब धरालीमध्ये होते असे लोकही येथे पोहोचत आहेत. आता त्यांच्याबद्दल कोणतीही माहिती नाही. २६ वर्षीय नगमा देखील त्यांच्यामध्ये आहे. त्या उत्तरकाशीच्या रहिवासी आहेत. नगमा यांचे वडील इब्राहिम खान आणि भाऊ फिरोज खान रंगकामासाठी धरालीमध्ये होते. भूस्खलनाच्या एक तास आधी नगमा यांनी त्यांच्या वडिलांशी बोलणे केले होते. तेव्हापासून त्यांचा फोन संपर्कात आलेला नाही.

विमानाने बाहेर काढण्यात आलेल्या लोकांमध्ये गंगोत्री धामच्या यात्रेवर गेलेले आणि धारालीच्या पलीकडे अडकलेले लोक होते. धरालीच्या आपत्तीनंतर, या सर्व लोकांना धरालीच्या आधी भीमताल येथे थांबवण्यात आले. भूस्खलनानंतर, गंगोत्रीपर्यंत वीज आणि मोबाईल नेटवर्क नाही. हे सर्व प्रवासी कोणाशीही बोलू शकत नसल्याची चिंता करत होते.

महाराष्ट्रातील छत्रपती संभाजी नगर येथील १८ जणांचा एक गट चार धाम यात्रेला निघाला होता. ५ ऑगस्ट रोजी प्रथम यमुनोत्री आणि नंतर गंगोत्रीला भेट दिल्यानंतर, ते सर्वजण गंगोत्रीहून उत्तरकाशीमार्गे परतत होते. जेव्हा धराली येथे आपत्ती आली तेव्हा हा गट तिथून काही किलोमीटर अंतरावर होता.

या गटाचा भाग असलेले कृष्णा म्हणतात की, भूस्खलनामुळे टॉवर कोसळले आणि नेटवर्क तुटले. मोबाईल नेटवर्क पूर्ववत झाल्यानंतर आम्ही घरी कळवले की आम्ही सुरक्षित आहोत. भैरों व्हॅलीहून पायी हर्षिलला आलेले लोकही धारलीतून गेले. त्यांनी या ठिकाणाचे व्हिडिओ बनवले आहेत. व्हिडिओमध्ये सर्वत्र फक्त चिखल आणि दगड दिसत आहेत.

अडकलेल्या प्रवाशांना हर्षिल येथून वाचवले जात आहे. त्यांना माटली आणि उत्तरकाशी येथे विमानाने हलवले जात आहे. ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत धाराली आणि हर्षिल येथून ३०८ लोकांना आयटीबीपी कॅम्प आणि जॉलीग्रँट हेलिबेसमध्ये विमानाने हलविण्यात आले आहे. हेलिकॉप्टर व्यतिरिक्त, २ चिनूक हेलिकॉप्टरद्वारे लोकांना वाचवले जात आहे. बचाव पथकातील १५५ कर्मचाऱ्यांना धराली येथे पाठवण्यात आले आहे. एकूणच धराली आणि हर्षिलचा विध्वंस अत्याधिक भयावह असा होता. जवान रात्रंदिवस मेहनत करून लोकांचा बचाव करताहेत.

■ ■ ■

# चले जाव घोषणांनी ब्रिटीशही थरकापला




आत्मक्लेश करणारी व्यक्ती क्रांतिकारक अशी व्यक्ती असते. क्रांतिकारक हा शब्द विशेषण म्हणून वापरला जाऊ शकतो; समाजावर किंवा मानवाच्या काही पैलूंवर मोठा प्रभाव पडतो, कारण त्याला सर्वस्वी ठरविले जाते. क्रांतीकारी याचा अर्थ असा क्रांतिकारी आहे जो एखाद्या व्यवस्थेविरुद्ध बंड करतो किंवा अन्याय, हिंसा किंवा काहीतरी चुकीचे आणि अस्वीकार्य अशा निर्णयाविरुद्ध बंड करतो. क्रांतीकारी ही अशी व्यक्ती आहे जी एकतर विद्रोह करते किंवा सद्य परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी त्याचे समर्थन करते.

---------------

या ऐतिहासिक चले जाव आंदोलनात ८ ऑगस्ट रोजी गोवालिया टँक मैदानावर वंदे मातरम् हे प्रेरणादायी, वंदनीय गीत संपूर्ण कडव्यांसहीत संगीतकलानिधी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर उर्फ मास्तर कृष्णराव यांनी झिंझोटी रागात तयार केलेल्या स्वकृत चालीत गाऊन सादर केले.

यावेळी पेटून उठलेल्या भव्य जनसमुदयासमोर हे तेजस्वी गीत गाण्यासाठी प्रसिद्ध गायक व कट्टर देशभक्त असलेल्या मास्तर कृष्णरावांचीच निवड करण्यात आली होती. या गीतावर इंग्रजांनी बंदी घातलेली असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या गीताचे संपूर्ण कडव्यांसहित जाहीर गायन करणे हे मोठे धाडस होते.

**प्रविण बागडे**
**नागपूर.**
**9923620919**

या आंदोलनात जनता मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली. देशभरात ९ लाख लोकांनी स्वतःला अटक करवून घेतली. दुस?या महायुद्धानंतर १९४५ मध्ये इंग्लंड सत्ता बदल होऊन मेजर क्लमेंट अॅटली यांच्या नेतृत्वाखाली त्रिमंत्री योजना सुरुवातीपासून भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत अनुकूल होती. मार्च १९४७ मध्ये पार्लमेंटमध्ये बोलतांना मेजर क्लमेंट अॅटली याने भारताविषयी धोरण स्पष्ट केले.

इंग्लंड लवकरच भारताला स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करेल व त्यासंबंधी वाटाघाटी करण्याकरिता भारतात त्रिमंत्री कमिशन पाठविण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. मेजर अॅटली यांच्या घोषणेनुसार २४ मार्च १९४७ रोजी त्रिमंत्री कमिशन भारतात आले. स्ट्रॅफर्ड क्रिप्स, लॉर्ड पेथिक लॉरेन्स व अलेक्झांडर हे तीन सभासद होते. या त्रिमंत्री कमिशनने राष्ट्रीय काँग्रेसची स्वातंत्र्याची मागणी करून एक योजना मांडली, ही योजना म्हणेजच त्रिमंत्री योजना होय.

भारत छोडो आंदोलन किंवा ऑगस्ट क्रांती हे ऑगस्ट १९४२ मध्ये संपूर्ण स्वराज्यासाठी सुरू झालेले नागरी असहकार आंदोलन चले जाव चळवळ होते. गांधीजींच्या करा किंवा मरा ह्या संदेशाने या आंदोलनाची सुरुवात झाली होती. मुंबई येथे ८ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी भारत छोडोचा नारा देऊन ब्रिटीशांविरोधात स्वातंत्र प्राप्तीसाठी आंदोलन उभारले होते. महात्मा गांधींजीसह कॉंगेस श्रेष्ठींना ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडो आंदोलनाचा एक भाग म्हणून अटक करण्यात आली होती.

या आंदोलनाचा गुप्त मसुदा सेवाग्राम येथे ९ जुलै रोजी बापुकुटीतील आदी निवासात तयार करण्यात आला होता आणि १५ जुलै रोजी कॉंग्रेस कार्य समितीतर्फे त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले होते.

त्या मसुद्याला पुढे वर्धा ठराव म्हणून मान्यता देण्यात आली आणि ९ जुलै २०१८रोजी चले जाव चळवळीचा ७५ वा वर्धापन दिन संपन्न झाला. १९४२ साली याच तारखेला महात्मा गांधी यांनी ब्रिटीशांना चले जावचा आदेश दिला आणि त्या आदेशाने भारतातली जनता पेटून उठली.

तिने उत्स्फूर्तपणे गावागावात सरकारच्या विरोधात आंदोलन केले. ह्या आंदोलनाचे प्रतिसाद शहरी भागासह ग्रामीण भागातही पसरले. तत्कालीन ग्रामीण भागातील अग्रनी कार्यकर्ते असणारे बुलडाणा जिल्ह्यातील, नागझरी गावचे रखमाजी कायंदे (सावकार) यांनी शेकडो कार्यकर्ते आपल्या स्वखर्चाने मुंबईला आंदोलनात सहभागी केले होते.

सेवाग्राम येथे झालेल्या या मसुदा बैठकीत जनआंदोलनाचे नियम, आंदोलन पुढे नेण्याचे सर्व अधिकार महात्मा गांधींकडे देण्यात येत असल्याचे यावेळी ठरविण्यात आले होते.

त्यानंतर २४ मार्च १९४७ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन भारतात आले. भारतात आल्याबरोबर निरनिराळ्या नेत्यांच्या भेटी घेऊन त्यांनी फाळणीची योजना तयार केली. ३ जून १९४७ रोजी ही योजना प्रसिद्ध करण्यात आली. मुस्लिम लीग व राष्ट्रीय कॉंग्रेसने या योजनेला मान्यता दिल्यानंतर १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने यांवर ठराव पास केला.

ब्रिटिश पार्लमेंटने पास केलेल्या भारताविषयीचा हा ठराव म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचा कायदा होय. अशा रितीने स्वातंत्र्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत हा स्वतंत्र झाला. भारताच्या इतिहासात ९ ऑगस्ट हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन या नावाने साजरा केला जातो.

भारत छोडो आंदोलन ही भारताच्या स्वातंत्र्याच्या लढाईतील एक महत्त्वाची घटना आहे आणि दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी भारत छोडो आंदोलन दिन म्हणून पण साजरा केला जातो. हा दिवस १९४२ मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने ब्रिटीश राजवटीच्या विरोधात जन आंदोलन सुरू केला होता. आजदिनी ८३ व्या ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शुभेच्छा !

■ ■ ■

# सरकारने स्वत:चे हीत बाजूला ठेवून देशाच्या हितासाठी काम करावे

मोफत वीज 'रेवडी' वितरणामुळे राज्यांवर ९६ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. ही रक्कम भारताच्या वार्षिक राष्ट्रीय अर्थसंकल्पापेक्षा खूपच जास्त आहे. या कर्जावर १३ टक्के व्याज द्यावे लागेल.

'ग्लोबल साउथ' मधील कोणत्याही देशाची अशी अर्थव्यवस्था नाही. एक राष्ट्र म्हणून, भारतावर सुमारे २०० लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. सरासरी नागरिकावर ४ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज आहे, परंतु इतके कर्ज का आहे हे देशाला कधीच स्पष्ट केले गेले नाही? तुम्हाला कर्ज का घ्यावे लागले?



**अॅड. आकाश सपेलकर**
**वकील सर्वोच्च न्यायालय**

भारत हा ४ ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त अर्थव्यवस्था असलेला आणि जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेला देश असताना ही परिस्थिती आहे. बिहारचे ताजे प्रकरण पाहता, ते ४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्जात बुडाले आहे, तर त्याचे दरडोई उत्पन्न वार्षिक ७०,००० रुपयांपेक्षा कमी आहे. असे असूनही, मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी घरगुती ग्राहकांना १२५ युनिट मोफत वीज देण्याची घोषणा केली आहे. अर्थात, हे पूर्णपणे 'निवडणुकीचे गोडवे' आहे.

बिहारमध्ये, ऑगस्ट महिन्यात येणा?या घरगुती बिलांमध्ये, जुलैमध्ये १२५ युनिट वीज वापरणा?यांचे बिल 'शून्य' असेल. विचित्र विरोधाभास असा आहे की नितीश कुमार हे मोफत वीजेसारख्या 'निवडणूक मोफत देणग्या'चे कट्टर विरोधक आहेत. त्यांनी विधानसभेत आणि विधानसभेबाहेरही 'रेवड्यां'विरुद्ध जाहीर विधाने केली आहेत. पंतप्रधान मोदींनीही खुल्या व्यासपीठावर म्हटले आहे की 'मोफत मोफत' देशाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करू शकते, पण बिहारमध्ये काय झाले?

तिथे भाजपची सत्ता आहे. एवढेच नाही तर भाजप शासित राज्यांमध्ये - दिल्ली, हरियाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, मध्यप्रदेश, छत्तीसगड, ओडिशा आणि महाराष्ट्रातही 'मोफत वीज' दिली जात आहे. अर्थात, 'रेवाडीं'ची ही निवडणूक परंपरा अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीत २०० युनिट वीज मोफत वाटून सुरू केली होती. त्यांचा 'निवडणूक मोफत' पंजाबमध्येही खूप यशस्वी ठरला आणि आम आदमी पक्षाचे (आप) सरकार स्थापन झाले. त्यानंतर, 'आप' ने त्याला 'निवडणूक चमत्कार' बनवले.

हे पाहून भाजप आणि काँग्रेसनेही भरपूर 'रेवड्या' वाटल्या. काँग्रेसची तीन राज्य सरकारे मोफत वीज वाटप करत आहेत. त्या राज्यांवर लाखो कोटी रुपयांचे कर्ज आहे ही वेगळी बाब आहे.

तामिळनाडूमध्ये विरोधी पक्ष द्रमुकचे राज्य आहे आणि त्यांच्यावर ९ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज आहे, परंतु सरकार यंत्रमाग कामगारांना १००० युनिटपर्यंत मोफत वीज देत आहे. खरं तर, या सरकारांना आणि राजकीय पक्षांना देशाच्या अर्थव्यवस्थेची अजिबात काळजी नाही.

दिल्ली हे एक अर्ध-राज्य आहे, एक केंद्रशासित प्रदेश आहे. भारत सरकार आणि संसद देखील तिथे आहे. दिल्लीचे दरडोई उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षाही चांगले आहे. दिल्ली महानगरातील रहिवाशांना कोणत्याही 'मोफत मोफत वस्तू'ची गरज नाही, परंतु ही युक्ती निवडणुका जिंकण्यासाठी देखील वापरली गेली आहे.

भाजपने दिल्लीत सरकार स्थापन केले आहे, म्हणून त्यांनी २०० युनिट मोफत वीज देण्याची आप सरकारची योजना सुरू ठेवली आहे. जेव्हा नितीश कुमार पहिल्यांदाच मुख्यमंत्री बनले आणि त्यांची सत्ता स्थिर झाली, तेव्हा त्यांनी महिलांच्या हितासाठी राज्यात दारूबंदी लागू केली. यामुळे तिजोरीचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होईल हे त्यांना माहीत होते, परंतु सामाजिकतेसाठी त्यांनी हे पाऊल उचलले. जरी दारूबंदी पूर्णपणे अयशस्वी झाली, तरी त्याचा राजकीय आणि निवडणूक परिणाम खोलवर झाला.

आता, वीज मंडळ आणि वीज वितरण कंपन्यांचे मोठे नुकसान असूनही, मुख्यमंत्र्यांनी मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे आणि तोही जनतेला दिलासा आणि सुविधा देण्याच्या उद्देशाने करण्यात आला आहे. पंतप्रधान मोदींनी एकदा देशासमोर आर्थिक संकट आणि वीज मंडळांच्या तोट्याचा मुद्दा मांडला होता.

सरकारने राज्य वीज मंडळांना लाखो कोटी रुपयांचे 'जामीन पॅकेज' दिले आहेत, परंतु अजूनही किती कर्ज शिल्लक आहे हे देशासमोर आहे. बिहार सरकारने घरगुती ग्राहकांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसवण्याची घोषणा केली आहे, परंतु त्यापूर्वी बिहारमधून गुन्हेगारी नष्ट केली पाहिजे.

जरा विचार करा, निवडणुका जिंकण्यासाठी, त्यांच्या संबंधित राज्य सरकारे महिलांसाठी रोख योजना, वीज बिल किंवा युनिट्सवर सूट इत्यादी धोरणे बनवून सरकारी तिजोरी लुटण्याचा विचार करतात आणि नवीन कर्जे घेत आहेत. केंद्र सरकारही आपल्या निवडणूक फायद्यासाठी अशा धोरणांचे समर्थन करते. हे लोकांच्या आणि देशाच्या भविष्यासाठी चांगले नाही. सरकारने स्वतःचे हित बाजूला ठेवून देशाच्या हितासाठी या प्रकरणाचा विचार केला पाहिजे.

■ ■ ■

# ९ ऑगस्ट क्रांती दिन

भारताच्या इतिहासात ' ९ ऑगस्ट क्रांती दिन ' हा सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखा प्रसंग आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी गांधीजींनी सुरू केलेले इतिहासातील देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारे हे शेवटचे आंदोलन आहे.

महात्मा गांधीजी यांनी ही चळवळ मुंबई येथून सुरू केली आणि संपूर्ण देशाला आव्हान केले. भारतीयांनो 'जागे व्हा' आता हे शेवटचे आंदोलन आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी भारतीयांना स्पष्टपणे गांधीजी म्हणाले. ' करा किंवा मरा ' अर्थातच 'करेंगे या मरेंगे '. खऱ्या अर्थाने हे आंदोलन ८ ऑगस्ट १९४२ च्या मध्यरात्रीपासून सुरु करून महात्मा गांधीजींनी मुंबईतून इंग्रजांना ठणकावून सांगितले.

**सौ. चैताली संगोपाल वरघट**
**मूर्तिजापूर, जि. अकोला.**
**9834583685**

भारत छोडो आंदोलनाचा नारा ब्रिटिशांच्या विरुद्ध स्वातंत्र चळवळीसाठी नारा देऊन आंदोलन उभारले. भारतीयांनो तुम्हाला जर इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त व्हायचे असेल तर प्राण देण्यास तयार व्हा. स्वातंत्र्यप्राप्ती हे शेवटचे आंदोलन असणार आहे. त्यामुळे संपूर्ण देश खडबडून जागा झाला. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देश मुक्त करण्यासाठी ९ ऑगस्ट रोजी अनेक क्रांतीवीर यात सहभागी झाले. ९ ऑगस्ट क्रांतिवीरांच्या बलिदानाची गाथा आहे. म्हणूनच आपण ९ ऑगस्ट 'भारत छोडो आंदोलन' म्हणून भारतात साजरा करतो.

या दिवशी भारतीयांनी इंग्रजांच्या अत्याचाराविरुद्ध बंड पुकारले आणि स्वातंत्र्याच्या दिशेने निर्णायक पाऊल टाकले. हा दिवस आपल्याला आपल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या शौर्याचे आणि बलिदानाची आठवण करून देतो. क्रांती दिनाच्या दिवशी देशभरात हिंसाचार, आंदोलने आणि सत्याग्रहाच्या घटना घडल्या.

रेल्वे स्टेशन, सरकारी कार्यालय, पोस्ट ऑफिस यावर हल्ले झाले. ब्रिटिश सत्तेने आंदोलन दळपण्यासाठी बऱ्याच उपाययोजना केल्या. अनेक ठिकाणी लष्करी कारवाई करण्यात आली. हजारो लोकांना अटक करण्यात आली. अनेकांचा मृत्यू झाला. भारत छोडो आंदोलने भारतीय स्वातंत्र्य चळवळ येथे निर्णायक पर्व ठरले. या आंदोलनाने ब्रिटिश सत्तेवर जबरदस्त दबाव निर्माण झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिश सत्ता आर्थिक दृष्ट्या आणि सैनिकी दृष्ट्या कमकुवत झाली होती.

भारतात होत असलेली आंदोलन आणि इतर घटना यामुळे अखेर ब्रिटिशांना भारताला स्वातंत्र देण्याचा निर्णय घ्यावा लागला. तसेच 'क्रांती दिन' हा स्वातंत्र्यानंतरही आपल्यासाठी महत्त्वाचा आहे. या दिवशी आपल्याला आपल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाची आठवण करून देतो. हा दिवस देशभक्तीची भावना जागवतो. आणि आपल्या जबाबदाऱ्या समाजाला देशाप्रती कोणत्या हे सांगतो.

स्वातंत्र्यानंतरच्या काळातही या दिवसाला साजरा करणे आपल्याला आपल्या इतिहासाची आणि संस्कृतीची जाणीव करून देते. क्रांती दिनाच्या दिवशी देशभर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शाळा, महाविद्यालय, कार्यालय, सरकारी संस्थांमध्ये ध्वजवंदन केले जाते. विद्यार्थी आणि शिक्षक देशभक्तीपर गाणी, नृत्य यां माध्यमातून क्रांती दिवस साजरा करतात आणि संस्कृतीक कार्यक्रम सादर करतात.

या दिवशी देशभक्तीवर भाषण आणि चर्चा सत्र आयोजित केली जातात. यां दिवशी स्वातंत्र्य चळवळीतील घटकांचा आढावा घेतला जातो.

'क्रांती दिन' भारतीय स्वातंत्र चळवळीत एक महत्त्वपूर्ण दिवस असल्यामुळे, या दिवशी भारतीयांनी इंग्रजांच्या अत्याचारविरुद्ध बंड पुकारले आणि स्वतंत्र्याच्या दिशेने निर्णयाक पाऊल टाकल्यामुळे, हा दिवस आपल्या स्वातंत्र्यसैनिकांचे शौर्य आणि बलिदानाची आठवण करून देतो. या दिवशी आपण आपल्या देशाच्या प्रगतीसाठी सामाजिक न्यायासाठी आणि मानवतेच्या कल्याणासाठी एकत्रपणे कार्य करण्याचा संकल्प करावा.

या दिवशी क्रांतिवीरांना श्रद्धांजली देण्यात येते. देशातून इंग्रज राजवटीला नाश करतांना अनेक क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी दिलेल्या बलिदानाची आठवण आजच्या नव्या पिढीला माहीत असावी म्हणून सर्वांनी आपल्या हृदयात क्रांतीची मशाल पेटून क्रांतिवीरांना अभिवादन केले पाहिजे. हे या दिवसाचे महत्व आहे. भारत छोडो आंदोलनाची सुरुवात ऑगस्ट महिन्यात झाल्यामुळे याला ऑगस्ट चळवळ किंवा ऑगस्ट क्रांती असेही म्हणतात.

स्वातंत्र्यवीरांना श्रद्धांजली वाहून तसेच देशाच्या एकतेची भाषणे आणि इतर कार्यक्रमाद्वारे हा दिवस साजरा केला जातो. शेवटी इतकेच म्हणेल " देशभक्तांच्या बलिदानामुळे, स्वातंत्र्य झालो आपण, जे देशासाठी फासावर चढले, छातीवर ज्यांनी गोळ्या झेलल्या, देशाच्या प्रेमाखातर ज्यांनी संसाराची राख रांगोळी झाली, त्या शहिदांना करावे शतशत वंदन..!

■ ■ ■

**भारताला आत्मनिर्भर करूया!**

स्वदेशीच्या वापराने देश आत्मनिर्भर बनू शकतो हे वाटते तितके सोपे नाही पण प्रयत्न केले, तर अशक्यही नाही. गेल्या दहा-बारा वर्षात भारताने केलेली प्रगती, विकास पाहून तो लवकरच सर्व क्षेत्रात आत्मनिर्भर बनेल अशी खात्री किंवा शंका सर्व देशांना आहे. राक्षसी महत्वकांक्षा असलेल्या अमेरिका आणि चीन यांना ही प्रगती सहन होत नाही त्यामुळे भारतावर विविध प्रकारे दबाव आणून त्याच्या प्रगतीला खीळ घालण्याचे प्रयत्न या देशांकडून सातत्याने केले जात आहेत.

**वाचक लिहितात**

याचाच एक भाग म्हणून अमेरिकेने भारतावर पंचवीस टक्के आयात शुल्क व रशियाशी व्यापार करणे बंद करण्याचे सुतवाच केले आहे. भारतानेही प्रत्यूत्तरादाखल एफ 35 लढाऊ विमाने आयात सूचीतून वगळण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेची प्रगती आणि आरोग्य विभाग बहुतांशी भारतीयांवर अवलंबून आहे. उद्या भारतीयांना भारतातच त्यांच्या मनाप्रमाणे काम आणि वेतन मिळाले तर अमेरिकेची आरोग्य व्यवस्था कोलमडून जाईल.

भारताने निर्यात शुल्क वाढवल्यास अमेरिकेतील लोकांना अधिक दराने वस्तू खरेदी कराव्या लागतील आणि त्याचा फटका ट्रम्प यांना निवडणुकीत बसू शकतो. पूर्वीच्या काळी भारत स्वयंपूर्ण आणि प्रगत देश होता. त्यावेळी भारतात सोन्याचा धूर निघायचा अशाप्रकारचे दाखले इतिहासात सापडतात. आज पुन्हा एकदा भारताला स्वयंपूर्ण अर्थात आत्मनिर्भर बनवण्यासाठी प्रत्येकाने निर्धार करूया. त्यासाठी स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देऊया.

■ **लीना मकरंद गाडगीळ**
**पनवेल.**

# निरोगी आरोग्यासाठी जवसाच्या बिया ठरतील फायदेशीर



संतुलित आहारात फक्त भाज्या आणि फळेच नसतात, तर आहारात काजू आणि बियांचाही समावेश केला पाहिजे. चिया बियाणे, जवस बियाणे, भोपळ्याच्या बिया, तीळ, सूर्यफूल बियाणे आणि सब्जा बियाणे इत्यादी अनेक प्रकारचे बिया असतात.

जवस बिया आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहेत. या बिया शरीराला प्रथिने, फायबर आणि जीवनसत्त्वे तसेच ओमेगा-३ फॅटी ॲसिड प्रदान करतात. लोक त्यांच्या आहारात जवस बियांचा समावेश करतात परंतु या बिया खाण्याची योग्य वेळ त्यांना माहिती नसते. अशा परिस्थितीत, जवसाच्या बिया नेमकं कोणत्या वेळी खाव्यात आणि त्यांचे सेवन करण्याची योग्य पद्धत जाणून घेऊयात.

तज्ञांच्या मते, जवसाच्या बिया खाण्याची सर्वोत्तम वेळ सकाळची आहे. जवसाच्या बिया सकाळी खाव्यात कारण त्यामुळे आतड्यांचा दाह कमी होतो. परंतु, या बिया जसेच्या तसे खाण्याऐवजी, त्यांना बारीक करून खाणे अधिक फायदेशीर आहे. जवस खाल्ल्यामुळे तुमचं शरीर निरोगी राहाते. आजकाल व्यस्त जीवनशैलीमुळे तुमच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देता येत नाही. आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे अनेक गंभीर आजार होण्याची शक्यता असते.

**जवस खाण्याचे आरोग्यदायी फायदे**

जवसाच्या बिया खाल्ल्याने पचनक्रियेसाठी विशेष फायदा होतो. या बिया बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून मुक्तता मिळवतात. ज्यांना बद्धकोष्ठतेचा त्रास आहे त्यांनी विशेषतः फायबरने समृद्ध असलेल्या या जवसाच्या बियांचे सेवन करावे.

या बियाण्यांमुळे हृदयाच्या आरोग्यालाही फायदा होतो. जवसाच्या बिया वाईट कोलेस्ट्रॉल कमी करतात, ज्यामुळे हृदयाच्या समस्या दूर राहतात.अळशीच्या बिया हार्मोनल बॅलन्समध्ये उपयुक्त ठरतात. या बिया खाल्ल्याने मूड स्विंग कमी होतात. महिलांना या बिया खाल्ल्याने विशेषतः फायदा होतो.

जवसाच्या बिया हाडांच्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहेत. मॅंगनीज आणि मॅग्नेशियम समृद्ध असलेल्या या बिया खाल्ल्याने हाडे मजबूत होण्यास मदत होते. वजन कमी करण्यासाठी जवसाचे बियाणे देखील खाल्ले जाऊ शकते. त्या खाल्ल्याने वारंवार भूक लागत नाही, ज्यामुळे जास्त अन्न सेवन कमी होते. जवसाच्या बियांमुळे त्वचा चमकदार आणि डागरहित दिसू लागते.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

जास्त जवस खाल्ल्यास पोटदुखी, गॅस, आणि अतिसार होऊ शकतो., जवसामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असल्याने, काही लोकांना बद्धकोष्ठतेचा त्रास होऊ शकतो., कधीकधी, जवसामुळे मळमळ आणि उलट्या देखील होऊ शकतात., काही लोकांना जवसाची ॲलर्जी असू शकते., ?लजीर्ची लक्षणे त्वचेवर पुरळ उठणे, खाज सुटणे, श्वास घेण्यास त्रास होणे आणि ?नाफिलेक्सिस यांचा समावेश असू

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## राखी पोर्णिमेचा महिमा

पालकांनो रक्षा बंधन
केवळ ईव्हेंट म्हणून
करु नका साजरा

त्यामागील संदर्भ
भावी पिढीला द्या
समजाऊन जरा...

भाऊ बहीणीच्या
ऋणानुबंधनाचे नाते
रक्षाबंधनाचा क्षण
संवर्धित करते ..!

# खासगी बस पार्किंगच्या समस्या 'जैसे-थे'

## महापालिका, वाहतूक पोलीस व आरटीओचा सोयीस्कर कानाडोळा; राजकीय पक्षांचेही खिसेगरमीतून जाणीवपूर्वक मौन

**विरार, दि. ८ : प्रतिनिधी**

विरार पूर्वेकडील मनवेलपाडा येथील अवैध खासगी बस पार्किंग समस्येने पुन्हा डोके वर काढले आहे. मनवेल पाडा विवांता हॉटेलसमोरील रस्त्यावर सर्वत्र मोठ्या प्रमाणात खासगी बसेस, टँकर, चारचाकी गाड्या, खासगी टुरिस्ट कंपन्यांच्या बसगाड्या, बेवारस वाहने इत्यादी रस्त्याच्या कडेला पार्किंग करण्यात येत असल्याने या रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे याविरोधात कारवाई करण्यात यावी. तसेच या बस या परिसरातून कायमस्वरुपी हटविण्यात याव्यात, अशी आग्रही मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

वाहनांसाठी स्वतंत्र वाहनतळ नसल्याने शहरात ठिकठिकाणी वाटेल तिथे गाड्या पार्क केल्या जात आहेत. बेवारस वाहनांची संख्यादेखील अधिक आहे. या बेवारस गाड्या जागा मिळेल तिथे उभ्या करून ठेवल्या जातात. याचा वापर गर्दुल्ले, दारुडे, जुगारी, अश्लील चाळे आणि नशापाणी करणाऱ्या प्रवृत्तीच्या व्यक्ती करतात. काही ठिकाणी तर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती या बेवारस वाहनांचा गैरफायदा घेऊन रात्री-अपरात्री दहशत पसरवतात. परिणामी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. या पार्किंगमुळे रात्री-अपरात्री प्रवास करणाऱ्या महिलांची सुरक्षा धोक्यात येत होती. त्यामुळे खासगी प्रवासी बस वाहनांना स्वतंत्र वाहनतळ उपलब्ध करून देण्यात यावे, अशी परिसरातील नागरिकांची मागणी आहे.

विरार-मनवेलपाडा येथील अवैध खासगी बस पार्किंग व त्यांच्या माध्यमातून होणारी सामान्य प्रवाशांची फसवणूक याविरोधात प्रसारमाध्यमांनी सातत्यपूर्ण आवाज उठवलेला होता. या पाठपुराव्यानंतर प्रहार जनशक्ति पक्षाच्या वतीने सदर प्रश्न २०२२ च्या पावसाळी अधिवेशानतही उपस्थित करण्यात आला होता. शिवाय २०२२ च्याच स्वातंत्र्यदिनीच्या 'जनता दरबारा`त आमदार हितेंद्र ठाकूर यांनी या समस्येवर संबंधित सर्व विभागांची झापड उडवली होती. त्यामुळे वाहतूक पोलिसांना दंडात्मक कारवाई करणे भाग पडले होते. त्यानंतर १ जानेवारी ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत ८१ प्रकरणांत तब्बल ७३ हजार ५०० रुपये दंड ठोठावलेला होता. त्याचेवळी महापालिका, आरटीओ व वाहतूक पोलिसांच्या संयुक्त माहिमेत या गाड्या टोईंग करून हटवण्यात आल्याने हा मार्ग मोकळा झाला होता.



या धडक कारवाईनंतर मनवेलपाडा येथील अनधिकृत खासगी बस पार्किंग मोहक सिटीमागील एका सरकारी खाजण जमिनीत स्थलांतरित करण्यात आल्या. मात्र, या अनधिकृत पार्किंगमुळेही अपघातांची शक्यता वाढल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे अनधिकृत पार्किंगकरता सरकारी खाजण जमीन भाडेतत्त्वावर देण्यात आली आहे. यातील बहुतांश बस रस्त्यावरच आणून उभ्या केल्या जात असल्याने व त्याचठिकाणी त्यांची स्वच्छता व दुरुस्ती केल्याने परिसरात अस्वच्छता पसरत असल्याच्या तक्रारी आहेत. मात्र, या पार्किंगचा आर्थिक लाभ काही खासगी व्यक्ती घेत असताना महसूल, वाहतूक पोलीस व आरटीओ प्रशासनाने याकडे सोयीस्कर डोळेझाक केलेली आहे. क्वचितप्रसंगी या बसआड उभे राहून वाहतूक पोलीस याठिकाणी कारवाई करत असले तरी त्यांची बहुतांश रुची व चोरटी नजर दुचाकींधारकांकडून दंडात्मक करण्यातच असते, हे लपून राहिलेले नाही.

विरार पूर्वेकडील डीमार्टजवळून-नालासोपारा प्रगतीनगरकडे जाणारा हा रस्ता आत्यंतिक वर्दळीचा आहे. सकाळी व सायंकाळच्या वेळात या रस्त्यावर प्रचंड वर्दळ असते. याचवेळात या बेकायदा वाहनतळावरून या बस या रस्त्यावर ये-जा करत असल्याने आणि त्याच रस्त्यावर उभ्या करून ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र, त्यानंरही महसूल, वाहतूक पोलीस व आरटीओ प्रशासनाने याकडे सोयीस्कर डोळेझाक करून खासगी व्यक्तींना अनैतिक धंद्यांना प्रोत्साहन देत असल्याने या मार्गावरून जाणारे प्रवासी व परिसरातील रहिवाशांनी संताप व्यक्त केलेला आहे.

विरार मनवेलपाडा रस्त्यावर पुन्हा खासगी बस बिनदिक्कत पार्किंग केल्या जात आहेत. मात्र, याविरोधात राजकीय पक्ष भूमिका घेत नसल्याने नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले आहे. या पार्किंगचा लाभ नेमका कुणाला मिळतो?, याबाबत याआधीही शंका उपस्थित करण्यात आलेल्या होत्या आणि आताही हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांसमोर कायम आहे. मात्र, राजकीय पक्ष, वाहतूक पोलीस, आरटीओ आणि महापालिका अशा सर्वांच्याच लाचखोरीमुळे सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

रस्त्यांकडेला असलेली गॅरेज व अन्य दुकानांसमोरही मोठ्या प्रमाणात चारचाकी, तीनचाकी व दुचाकी वाहने अवैधरीत्या पार्किंग करून ठेवण्यात येत असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. त्यात या रस्त्यांवर फेरीवाल्यांची संख्याही लक्षणीय असल्याने संध्याकाळच्या अथवा शाळांच्या वेळात या रस्त्यांवरून चालणे जिकिरीचे ठरते. अशा वेळांत या रस्त्यांवर एखादे मोठे वाहन आल्यास अपघाताची संभावना असते.

वसई-विरार महापालिकेने दोन वर्षांपूर्वी अशा वाहनधारकांना रस्त्यांवर पडून असलेली विनावापराची वाहने हटवण्याचे आवाहन केले होते. अन्यथा; प्रतिदिन अशा वाहनांना २०० रुपये इतका दंड ठोठावण्याचा इशाराही दिला होता. मात्र, महापालिकेची ही मोहीम थंडावल्याने आज या रस्त्यांवरील भंगार वाहने, गॅरेज दुकाने आणि अवैध पार्किंगमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे.

एकदिशा मार्ग, आवश्यक तिथे पार्किंग-नोपार्किंगचे फलक लावण्यासंदर्भातही वाहतूक पोलिसांच्या माध्यमातून वसई-विरार महापालिकेला सूचित करण्यात आलेले आहे. मात्र, महापालिकेने या सूचनांची अंमलबजावणीच केलेली नसल्याने विरार-मनवेलपाडा परिसरातील पार्किंगचा प्रश्न अत्यंत गंभीर झालेला आहे.

## डंपरच्या धडकेत पती पत्नीचा मृत्यू गुन्हा दाखल

**भाईंदर, दि. ८ : प्रतिनिधी**

भाईंदरमध्ये दुचाकीला डंपरची धडक बसून पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. निलेश माळी (५४) आणि मंजू माळी (५०) असे त्यांची नाव आहेत. याप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निलेश माळी आणि मंजू माळी हे उत्तन येथील रहिवासी आहेत. गुरुवारी दुपारी ते दुचाकीने उत्तनहून मिरा रोडच्या दिशेने जात होते. भाईंदर पश्चिम येथील राधास्वामी सत्संग परिसरात, समोरून जाणाऱ्या डंपरला ओव्हरटेक करत असताना त्यांची दुचाकी घसरून अपघात झाला. या अपघातात निलेश माळी यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला, तर मंजू माळी यांना रुग्णालयात नेण्यापूर्वीच मृत्यू झाला. याप्रकरणी अपघाताची नोंद करण्यात आली असून, अधिक तपास सुरू आहे, अशी माहिती भाईंदर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कांबळे यांनी दिली.

## उल्हासनगरमध्ये हर घर तिरंगा अभियानांतर्गत भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन

**उल्हासनगर, दि. ८ : प्रतिनिधी**

निर्वासितांचे शहर म्हणून ओळख असलेल्या उल्हासनगरचा ७६ व स्थापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने महापालिकेकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्थापन दिनाच्या निमित्ताने उल्हासनगर महानगरपालिकेपासून चोपडा कोर्ट ते विराट अंबे स्पोर्ट्स क्लब पर्यंत हर घर तिरंगा अभियानांतर्गत भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. आमदार कुमार आयलानी व इतर मान्यवरांनी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व झेंडा दाखवून या तिरंगा रॅलीला सुरुवात केली.

रॅली दरम्यान नागरिकांमध्ये देशभक्तीचा उत्साह दिसून आला. या नंतर उल्हासनगर शहराच्या स्थापनेच्या वेळी उभारण्यात आलेल्या ऐतिहासिक कोणशिलेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले . यावेळी उपस्थित मान्यवरांनी शहराच्या स्थापनेचा इतिहास उलगडून दाखवला.

या कार्यक्रमात एस.एस.टी महाविद्यालय, सी.एच.एम महाविद्यालय ,आर.के.टी महाविद्यालयासह इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भव्य तिरंगा रॅलीमध्ये सहभाग घेतला. विशेष आकर्षण ठरले त्या आर.के.टी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले उल्हासनगर शहराच्या इतिहासावर आधारित पथनाट्य , ज्याला उपस्थितांनी भरपूर प्रतिसाद दिला. उल्हासनगरच्या वाटचालीतील ऐतिहासिक टप्प्याची आठवण करून देणारा हा दिवस अनेकांच्या मनात अभिमानाची भावना निर्माण करणारा ठरला. त्यावेळी भाजपा नेते महेश सुखरामानी यांनी यानिमित्त शहरातील नागरिकांचे अभिनंदन केले. या तिरंगा रॅलीमध्ये भाजप जिल्हाध्यक्ष राजेश वधारीया, महेश सुखरामणी, उल्हासनगर महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी अजय साबळे, मुख्य स्वच्छता निरीक्षक विनोद केणे, नवीन दुसेजा, विकी इसराणी, देवराम ठुबे यांच्यासह विविध महाविद्यालये, शाळा आणि उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## महामार्गावरील भीषण अपघातात चालकाचा मृत्यू

**मनोर, दि. ८ : प्रतिनिधी**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील ढेकाळे गावाच्या हद्दीत वाघोबा खिंडीत झालेल्या भीषण अपघातात टेम्पो चालकाचा मृत्यू झाला. तर क्लीनर गंभीर जखमी झाला आहे. सकाळी साडे दहा वाजण्याच्या सुमारास अपघात झाला होता. मंजुनाथ रुद्रप्पा नंदी असे मृत्युमुखी पडलेल्या चालकाचे नाव असून शिवानंद अशोक अंकलीन असे जखमी क्लिनरचे नाव आहे. मुंबईच्या दिशेने जात असताना वाघोबा खिंडीत भरधाव वेगात असलेल्या टेम्पोवरील नियंत्रण सुटल्याने महामार्गावर उभ्या असलेल्या कंटेनरला मागून जाऊन धडकला. याभिषण अपघातात टेम्पोच्या चालक केबिनचा चक्काचूर होऊन टेम्पो चालक केबिनमध्ये अडकून पडला होता. घटनास्थळी दाखल झालेल्या महामार्ग सुरक्षा पोलिसांनी क्रेन, रुग्णवहिका चालक आणि स्थानिकांच्या मदतीने टेम्पो चालकाचा मृतदेह केबिनमधून बाहेर काढला.



टेम्पो चालकाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी मनोर ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला आहे.जखमी क्लीनरला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याअपघातामुळे महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. अपघातग्रस्त टेम्पो महामार्गावरून हटवल्यानंतर तासाभराने वाहतूक पूर्ववत करण्यात महामार्ग सुरक्षा पोलिसांना यश आले.

## अंबरनाथ नगरपालिकेची अनधिकृत बांधकांमावर कारवाई

**अंबरनाथ, दि. ८ : प्रतिनिधी**

अंबरनाथ येथील पूर्व आणि पश्चिम रस्त्यावरील अनेक अनधिकृत बांधकामे, तसेच पोलीस स्टेशन, महात्मा गांधी विद्यालय,परिसर व पूर्व भागातील हुतात्मा चौका पासून ते वडवली वेलफेयर सेंटर जवळील राखीव भूखंडा वरील तथा फुटपाथवर अनधिकृत पणे फेरीवाले टोपलीवाले, हातगाडी वाले यांना हटवून नगरपालिकेच्या अतिक्रमाण विभागाने रस्ता नागरिकां करीता मोकळा करुन दिला आहे.

अंबरनाथ येथे शनिवार ९ ऑगष्ट रोजी न्यायालयाच्या इमारतीचा लोकार्पण सोहळा साजरा होत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी, व अन्य न्यायमूर्ती येणार असल्या कारणाने अंबरनाथचे मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांच्या आदेशानुसार काल सकाळी ११ वाजे पासून ते सायंकाळ पर्यंत अंबरनाथ नगरपालिकेच्या हद्दीतील, मुख्य रस्त्यावरील अनधिकृत अतिक्रमणे हटविण्यात आली असुन या सर्वांचे व्यवसायीक सामान जप्त करण्यात आले आहे. यावेळी काही अनधिकृत दुकानें, ,व्यवसायिक टपऱ्याआणि बांधकामा वर तोडक कारवाई केली आहे.

## उल्हासनगरमध्ये सव्वा कोटी पार्थिव शिवलिंग महायज्ञाची भव्य तयारी

**उल्हासनगर, दि. ८ : प्रतिनिधी**

उल्हासनगर - अंबरनाथ येथे ११ ते २१ ऑगस्ट २०२५ या ११ दिवसांत सव्वा कोटी पार्थिव शिवलिंग निर्माण आणि शिवमहायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात दररोज १२ लाख शिवलिंगांची निर्मिती करुन त्यांचे पूजन आणि विसर्जन केले जाईल.

या महायज्ञाचे अधिष्ठाता पूज्य बृजेशानंदजी महाराज आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या ५० व्या महायज्ञाची तयारी शिवसेनेचे कल्याण जिल्हाप्रमुख धनंजय बोडारे आणि आयोजक अध्यक्ष संजय गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. ११ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता २१०० महिलांची कलश यात्रा निघेल आणि त्यानंतर पूजनाला सुरुवात होईल. महायज्ञ दररोज सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत चालेल. दुपारी ३ ते ५ या



वेळेत पूज्य बृजेशानंदजी महाराज संगीतमय शिवमाहात्म्य सांगतील. दररोज सर्व भक्तांसाठी महाप्रसाद आणि भंडाऱ्याचे आयोजनही करण्यात आले आहे.

या सोहळ्यात माजी केंद्रीय मंत्री अश्विनी चौबे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि भाजपाचे राष्ट्रीय नेते संजय जोशी यांच्यासह अनेक नेते, संत आणि लाखो शिवभक्त सहभागी होणार आहेत. सर्वांनी या अध्यात्मिक सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन धनंजय बोडारे यांनी केले आहे.

## आज का अंदाज

शनिवार ९ ऑगस्ट २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार |
|---|---|---|---|---|
| ३ | ४ | ५ | ७ | |
| १४८ | १४९ | १६८ | २६१ | |
| ३४६ | २५७ | २६७ | ४५८ | |
| ४९० | ३४७ | ३६६ | ८९० | |
| ३२ | ४२ | ५१ | ७१ | |
| ३६ | ४६ | ५८ | ७८ | |
| ३० | ४० | ५९ | ७९ | |

### ९ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ८३ | ९३ |
| २० | ५० | ८६ | ९४ |
| २७ | ५७ | ८४ | ९६ |
| २४६ | २३० | १३४ | १४४ |
| ३९० | ३४८ | २७९ | ४५० |
| ४८० | ७८० | ३६९ | ३६० |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासार्ठ जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

## स्वातंत्र्यदिनानिमित्त क्रोमामध्ये आकर्षक डील्स

**नागपूर, ८ ऑगस्ट :** टाटा परिवारातील एक सदस्य, भारतातील पहिले आणि सर्वात विश्वासार्ह ओम्नी-चॅनेल इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर क्रोमाने त्यांचा बहुप्रतिक्षित स्वातंत्र्यदिन सेल जाहीर केला आहे. क्रोमासोबत यंदाचा स्वातंत्र्यदिन खरोखर खास बनवण्यासाठी सज्ज व्हा, कारण इथे विविध प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक्सवर उत्तम डील आणि आतापर्यंतची सर्वात मोठी सूट मिळत आहे. या सेलचा लाभ १७ ऑगस्ट २०२५ पर्यंत घेता येईल. देशभर पसरलेल्या ५६० हून अधिक क्रोमा स्टोअरमध्ये बंपर डील, उत्तम मूल्य, परवडणाऱ्या किमती आणि अतुलनीय श्रेणी उपलब्ध आहे.

स्मार्टफोनपासून ते टीव्ही, रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन आणि इतर अनेक उत्पादने या सेलमध्ये आहेत. आकर्षक किमतीत सर्वात नवीनतम तंत्रज्ञान अपग्रेड करण्याची उत्तम संधी क्रोमाने आपल्या ग्राहकांना उपलब्ध करवून दिली आहे. इन्फिनिटी रिटेलच्या प्रवक्त्याने सांगितले की, या स्वातंत्र्यदिनी, क्रोमाने त्यांच्या आतापर्यंतच्या एका सर्वात मोठ्या सेलची सुरुवात केली आहे, ज्यामध्ये विविध श्रेणींमध्ये ५०% पर्यंत सूट देण्यात येत आहे. या सेलमध्ये १२,५०० रुपयांपर्यंतचा एक्सक्लुझिव्ह बँक कॅशबॅक, रोमांचक एक्सचेंज फायदे, शून्य-खर्च ईएमआय पर्याय आणि विशेष विद्यार्थी ऑफर देखील समाविष्ट आहेत. क्रोमाने ग्राहकांना त्यांचे तंत्रज्ञान अपग्रेड करणे आणखी सोपे केले आहे. या ऑफर ५६० हून जास्त क्रोमा स्टोअरमध्ये उपलब्ध आहेत, ज्यामुळे संपूर्ण भारतातील ग्राहकांना सुविधाजनक खरेदीचा अनुभव घेता येईल.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्ही राजकारणात तुमच्या विरोधकांना पराभूत करू शकाल. दूरच्या देशातील नातेवाईकाची बातमी मिळेल. तुमच्या नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याशी तुमची जवळीक वाढेल. व्यवसायात वाढ होईल.

**वृषभ :** आजचा दिवस आनंदाचा असेल. पूर्ण होणाऱ्या कामातील अडथळे दूर होतील. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका. तुमच्या शहाणपणाने आणि विवेकबुद्धीने काम करा.

**मिथुन :** सामाजिक कार्यात रस वाढेल. व्यवसाय क्षेत्राशी संबंधित लोकांना चढ-उतारांचा सामना करावा लागेल. तुम्हाला काही चांगली बातमी मिळू शकते. स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवा.

**कर्क :** तुम्ही कामाच्या ठिकाणी व्यस्त राहाल. काही महत्त्वाचे काम पूर्ण करताना तुम्हाला अडथळ्यांना सामोरे जावे लागू शकते. कामाच्या ठिकाणी तुमचे चारित्र्य शुद्ध ठेवा. प्रेमाने वागा.

**सिंह :** आज दिवसाची सुरुवात काही चांगल्या बातमीने होईल. कामाच्या ठिकाणी खूप धावपळ होणार नाही. सामाजिक कार्यात महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी मिळेल. व्यवसायातील नुकसान टाळता येईल.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप शुभ आणि प्रगतीशील असेल. महत्त्वाच्या कामात काळजीपूर्वक विचार करून निर्णय घ्या. विरोधक तुमच्या प्रगतीचा हेवा करतील. नीट विचार करून निर्णय घ्या.

**तुळ :** आज अनावश्यक वादात पडू नका. तुम्हाला सामाजिक कार्यात महत्त्वाची जबाबदारी मिळू शकते. आज कामाच्या क्षेत्रात सुरू असलेल्या समस्या कमी होतील.

**वृश्चिक :** समाजातील उच्चपदस्थ आणि प्रतिष्ठित लोकांशी संपर्क वाढतील. व्यवसायात तुम्हाला नवीन भागीदार मिळतील. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका. व्यवसाय क्षेत्रात नफा मिळेल.


**धनु :** आजचा काळ अधिक फायदेशीर आणि प्रगतीशील असेल. आधीच नियोजित कामांमध्ये तुम्हाला यश मिळेल. तुमच्या विरोधकांपासून सावध रहा. तुमच्या योजना कोणासमोरही उघड करू नका.

**मकर :** आज दिवसाची सुरुवात काही चांगल्या बातम्यांनी होईल. कामाच्या ठिकाणी अधीनस्थांशी अनावश्यक वाद टाळा. महत्त्वाच्या कामांमध्ये प्रगती होईल. संवेदनशीलता वाढवण्याची गरज असेल.

**कुंभ :** आज तुम्हाला महत्त्वाच्या बाबींमध्ये काळजीपूर्वक विचार करून निर्णय घ्यावे लागतील. घाईघाईत कोणताही मोठा निर्णय घेऊ नका, विशेषत: कामाच्या बाबतीत. भावनांवर नियंत्रण ठेवा.

**मीन :** सामाजिक कार्यात रस वाढेल.लांब पल्ल्याच्या प्रवासात सावधगिरी बाळगा. घाईघाईत कोणावरही विश्वास ठेवू नका. राजकारणात सहभागी असलेल्या लोकांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील.

## शब्दकोडे क्रमांक २१८६



**आडवे शब्द :-**
१) खूप, फार, अतिशय
३) माणूस, आदमी
६) कृश होणे वाळणे
८) सर्प
१०) बगळा
१२) श्रीयुत
१३) अपहार
१४) तात्काळ
१७) आरडाओरड, कल्लोळ
१९) गोंधळ व अव्यवस्थेची स्थिती
२३) समशेर
२५) छिद्रातून जमिनीवर पडणारा
२९) निराश
३१) सापाची एक जात
३२) युक्ती
३४) एक द्विदल धान्य
३५) विहिरीतून पाणी काढण्याचे विशिष्ठ प्रकारचे भांडे
३७) मन स्वाधीन असलेला, लहरी, निधड्या छातीचा
३९) वाहतूक
४१) चाकरी करणारा
४२) देणारा
४३) निमित्त
४४) आरोप
४८) एकाद्यास मृत्युपासून वाचविणे
५१) कान
५२) पाणी
५३) एक प्रश्नार्थक शब्द
५४) पुरुष
५६) फायदा
५७) होडी, जहाज इ
६०) मोठी सुरी
६१) अमृत
६२) बुटका, बटु
६३) आकाशाला भिडणारे
६४) विष
६६) मालक
७१) मृत्यू नसलेला
७३) लाकूड कापण्याचे साधन
७५) श्रम, मेहनत
७६) नर्तन
७७) राजाला, वरिष्ठाला दिलेली भेट वस्तू
७८) उंट हाकणारा

**उभे शब्द :-**
१) अमर्याद
२) विडा साहित्याचे ताट
४) सारखा
५) राजा
६) घोडा
७) कमळाचे तळे
८) तात्पर्य
९) मातीचा दिवा
११) जेमतेम, मोठ्या मुश्किलीने
१३) वस्तुंच्या जागा सारख्या बदलणे
१५) चिकटविणे
१६) मातीचा कण
१८) शंकर
२०) अंड्यातील पिवळा भाग
२१) प्राचीन
२२) पद्धत
२४) वल्लरी
२५) पंकज
२६) भित्रा
२८) मदत
३०) शांत करणे
३२) एक रत्न
३३) माया, प्रेम
३४) पाणी
३६) कापडाचा एक प्रकार
३८) घेणे, अंगीकार
३९) गोव्याची राजधानी
४१) छचोर चाळे करणारी स्त्री
४२) किंमत
४६) संपूर्ण
४७) त्रास, कष्ट
४९) सिंह
५०) दरवाजा
५२) आपले राष्ट्रगीत
५५) गाढव
५७) लोकसंख्येची मोजणी
५८) यज्ञ
५९) उंदीरासारखा एक प्राणी
६१) परमेश्वर
६५) एकाच्या हातातून दुसऱ्याच्या हाती देणे
६६) हिंमत, धैर्य
६८) नवऱ्याचा भाऊ
६९) नशीब
७२) पराग
७३) मणका
७४) व्रत

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# लासलगाव बाजार समितीला सुभाषनगर ग्रामपंचायत हद्दीत जागा

## ०८ हेक्टर ६१.५६ आर जागा शासकीय दराने मंजूर : सभापती

**लासलगाव ।** लासलगांव बाजार समितीस विंचूर उपबाजार आवाराकरीता मौजे सुभाषनगर ग्रामपंचायत हद्दीतील 08 हेक्टर 61.56 आर जागा राज्य शासनाकडून शासकीय दराने मंजुर झाली असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर जगताप व उपसभापती संदीप दरेकर यांनी दिली.




लासलगांव बाजार समितीने विंचूर व परिसरातील कांदा व सर्व प्रकारचा भुसार, तेलबिया शेतीमाल उत्पादक शेतकरी बांधवांना जवळच शेतीमाल विक्रीची सोय निर्माण व्हावी यासाठी विंचूर येथे उपबाजार आवार सुरू केलेले आहे. त्यासाठी बाजार समितीने स्व:मालकीची 02 हे 40 आर जागा खरेदी करून सदर जागेत कांदा, भुसार व तेलबिया या शेतीमालाचे लिलाव सुरू केलेले आहे. तसेच सदर जागेत शेतकरी बांधवांसाठी भुईकाटा, गोदाम, कॅन्टीन, पिण्याच्या पाण्याचा आर. ओ. प्लॅन्ट, पाण्याची टाकी, कार्यालयीन इमारत इ. सुविधा निर्माण केलेल्या आहे. परंतु विंचूर उपबाजार आवारावर व्यापारी वर्ग व बाजार समितीकडून दररोज मिळणाऱ्या चांगल्या सेवा व सुविधांमुळे दिवसेंदिवस सदर बाजार आवारावर कांदा, भुसार व तेलबिया ह्या शेतीमालाची मोठ्या प्रमाणात उलाढाल होऊ लागल्याने बाजार समितीस सदरची जागा अपुरी पडु लागली. त्यामुळे बाजार समितीच्या तत्कालीन सभापती सुवर्णा जगताप व त्यांच्या सहकारी सदस्य मंडळाने विंचूर उपबाजार आवाराकरिता छत्रपती संभाजी नगर-नाशिक महामार्गालगत विंचूर एमआयडीसीजवळील मौजे सुभाषनगर ग्रामपंचायत हद्दीतील 08 हेक्टर 61.56 आर जागा शासकीय दराने खरेदी करून सदर जागेत शेतकरी बांधवांसाठी प्रशस्त बाजार आवार, वॉल कंपाऊंड, कॉंक्रीटीकरण, भुईकाटा, पिण्याचे पाणी, शेतकरी निवास, कार्यालयीन इमारत इ. आवश्यक सोईसुविधा निर्माण करून कांदा, भुसार, तेलबिया, बेदाणा, फळे व भाजीपाला इ. शेतीमालाचे लिलाव सुरू करण्याचे ठरविले होते.

त्यानुसार बाजार समितीने सदर जागा शासकीय दराने संपादीत करणेसाठी आवश्यक त्या सर्व शासकीय विभागांच्या मंजुरी व शिफारशी घेऊन तसा प्रस्ताव तत्कालीन सभापती सुवर्णा जगताप यांनी सन 2021 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या महसुल विभागाकडे पाठविला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने बुधवार, दि. 06/08/2025 रोजी बाजार समितीस विंचूर उपबाजार आवाराकरीता मौजे सुभाषनगर ग्रामपंचायत हद्दीतील 08 हेक्टर 61.56 आर जागा उपबाजार या सार्वजनिक प्रयोजनासाठी नाममात्र रू. 1/- या दराने कब्जेहक्काची रक्कम आकारून व वसूल करून मंजूर केली असल्याचे कळविले आहे.

बाजार समितीस सदरची जागा शासकीय दराने संपादित करून मिळणेसाठी सर्वच त्या त्या मान्यवरांचे सहकार्य लाभल्याचे जगताप यांनी सांगितले.

# ईपीएस ९५ पेन्शनधारकांचे राजधानी दिल्लीत धरणे

## ७५०० पेन्शन, महागाई भत्त्यासह मेडिकल खर्चाची मागणी



**नाशिक ।** ईपीएस 95 पेन्शन स्कीम अंतर्गत येणाऱ्या सर्वच सेवानिवृत्त कामगारांना अतिशय तुटपुंजी पेन्शन मिळते. ती वाढवून मिळावी तसेच महागाई भत्ता आणि मेडिकल खर्च मिळावा, अशी या पेन्शनधारकांची मागणी असून, त्यासाठी राजधानी दिल्लीत जंतर मंतर येथे धरणे देण्यात आली.

ईपीएस 95 पेन्शन स्कीमखाली भारतातील सर्व राज्यांचे एस.टी. महामंडळे, एचएएल, को.ऑप. बँका, तसेच सर्व इंडस्ट्रीअल कंपन्या यामधील कामगार येतात. यातील आजपर्यंत सेवानिवृत्त झालेल्यांना फक्त १०००/- ते ३०००/- पेन्शन मिळते अशा सर्व पेन्शन धारकांना कमीत कमी ७५००/- हजार रुपये व त्यावर महागाई भत्ता व दोघा नवरा बायको यांना मेडिकलचा खर्च मिळावा, या मागणीसाठी गेल्या ४ व ५ व ऑगष्ट या दोन दिवशी जंतरमंतर, दिल्ली येथे धरणे आंदोलन होते. मोठ्या संख्येने पेन्शनधारकांनी त्यात सहभाग नोंदविला होता. शासनाने आमची ही रास्त मागणी मान्य करून आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी पेन्शनधारकांनी केली आहे.

# चिमुकल्यांनी बांधली सफाई कर्मचाऱ्यांना राखी वैनतेय विद्यामंदिरात अनोखे रक्षाबंधन



**निफाड ।** बहिण-भावाच्या अतूट नात्याच्या रक्षाबंधन सणाचे औचित्य साधत निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थीनींनी स्वच्छतेचे काम करून सर्व नागरिकांचे आरोग्य अबाधित ठेवण्यास मदत करणा-या सफाई कर्मचा-यांना राख्या बांधून सामाजिक बंधुत्वाचा संदेश दिला.

निफाड नगरपंचायतीतील सफाई कर्मचारी यांचा शिक्षक गोरख सानप, किरण खैरनार, संजय जाधव यांच्या हस्ते टोपी, गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे व विद्यार्थीनींनी सर्व कर्मचारी बंधूंच्या राबणा-या हातांवर राखी बांधली.

"गाडी वाला आया घरसे कचरा निकाल" असा संदेश देत घंटागाडीतून घराघरातील, वसाहती, गल्ल्या, मंदिरे, शासकीय कार्यालये, शाळा, बाजारपेठा येथील केरकचरा विनातक्रार गोळा करून संपूर्ण गाव स्वच्छ करणा-या या स्वच्छता दूतांच्या कार्याचा याप्रसंगी गौरव करीत सलाम करण्यात आला. चिमुकल्यांच्या या अनोख्या सत्काराने अनेक कर्मचारी भावूक होऊन त्यांचे डोळे पाणावले.

> चिमुकल्यांनी आमचा केलेला सन्मान व आमच्या कार्याची घेतलेली दखल यामुळे आम्ही भारावून गेलो. या रक्षाबंधनाच्या सोहळ्याने आमचे काम अधिक निष्ठेने करण्याची प्रेरणा मिळाली.
> **- मनोज ढकोलिया, सफाई कर्मचारी, नगरपंचायत निफाड**

> शहरातील सफाई कर्मचारी स्वतः घाणीत जगतात पण इतरांचं रोगराईपासून रक्षण करतात. या कष्टक-यांच्याच मेहनतीवर समाज चालला आहे. तेच योग्य मोबदला व सन्मानापासून वंचित आहेत. चिमुकल्यांनी राबविलेला उपक्रम समाजाला प्रेरणा देणारा आहे.
> **- वि. दा. व्यवहारे, अध्यक्ष, न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ**

### या कर्मचाऱ्यांचा झाला सन्मान

सुनील माळी, मनोज ढकोलिया, प्रशांत पवार, आशिष झाल्टे, कृष्णा निकम, सागर अस्वले, गोविंद गांगुर्डे, समाधान गांगुर्डे, अरूण धारराव, बिलाल पठाण, तुषार इंगळे, संकेत मोगरे, राजेश निशाद, अविनाश केदारे, सागर गांगुर्डे.

कोणतेही काम कमी दर्जाचे नाही असा सामाजिक एकतेचा संदेश देत रक्षाबंधन सणाचे मांगल्य जपत शाळेने राबविलेल्या या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, संस्थापक विश्वस्त ॲड ल.जि. उगांवकर, विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, राजेश सोनी, ॲड. दिलीप वाघावकर, विश्वास कराड, मधुकर राऊत, प्रभाकर कुयटे, नरेंद्र नांदे, निफाड पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत गायकवाड, विस्तार अधिकारी लता भरसट, केंद्रप्रमुख अनिता आहिरे व पालकांनी कौतुक केले.

उपक्रमाच्या यशस्वितेसाठी गोरख सानप, किरण खेरनार, संजय जाधव, कल्पना पेठे, प्रतिभा खैरनार व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### रक्षाबंधनाच्या निमित्ताने...

# राष्ट्रीय हरित सेनेने बांधल्या खऱ्या रक्षकांना राख्या

**नाशिक ।** रक्षाबंधन या पवित्र सणाचे औचित्य साधून स्वामी विवेकानंद विद्यालय, पंचवटी येथील राष्ट्रीय हरित सेना (इको क्लब)




च्या विद्यार्थिनींनी एक आगळीवेगळी सामाजिक आणि पर्यावरणपूरक भूमिका बजावत, पंचवटी पोलीस स्टेशन येथील पोलीस बांधवांना स्वतः हाताने तयार केलेल्या "टाकाऊतून टिकाऊ" राख्या बांधून त्यांचा सन्मान केला.

विद्यार्थिनींनी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना राखी बांधताना "आपण आमचे खरे रक्षक आहात" असा आदरभाव व्यक्त केला. या वेळी उपस्थित पोलीस बांधवांनी विद्यार्थिनींच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक करत म्हणाले, "रक्षाबंधन हे एकमेकांच्या रक्षणाचे वचन असते. आम्ही सदैव तुमच्या पाठीशी आहोत. कोणतीही अडचण आली, तर आमच्याशी कधीही संपर्क करा. आम्ही तत्पर आहोत." या प्रेरणादायी उपक्रमाच्या प्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजेंद्र पाटील यांनी विद्यार्थिनींच्या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले. या वेळी पोलीस उपनिरीक्षक कैलास जाधव, सचिन चव्हाण, पोलीस अंमलदार मुश्रीफ शेख, पोलीस हवालदार अनिल गुंबाडे, शरद ठाकरे, तसेच पोलीस कर्मचारी अस्तिक गायकवाड, राजेश महाले, श्रीकांत साळवे, चितळकर, रोहिणी उगले, रोहिणी सवंद्रे, रोहिणी साबळे, स्वाती फड आदी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी विद्यार्थिनींच्या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

या कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक किशोर झोटिंग आणि पर्यवेक्षिका शुभदा टकले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यासाठी क्रीडाशिक्षक अरुण जाधव, प्रदीपसिंग पाटील आणि मनीषा पवार यांनी कामकाज पाहिले. या उपक्रमामध्ये विद्यार्थिनींनी केवळ एक राखी बांधून औपचारिकता पार पाडली नाही, तर त्यांनी रक्षण करणाऱ्या खऱ्या रक्षकांचा सन्मान करून समाजात सकारात्मक संदेश दिला. राख्यांचे टाकाऊतून टिकाऊ निर्मिती ही पर्यावरण संवर्धनाचे भान ठेवणारी जाणीवही ठरली. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीवेचे, देशप्रेमाचे आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोनाचे एक उत्कृष्ट उदाहरण ठरले.

# पालखेड बंधारा येथील अतिक्रमणाबाबत चौकशीचे आदेश

**दिंडोरी ।** पालखेड बंधारा येथील अतिक्रमणाबाबत छावा जनक्रांती संघटनेचे तालुकाध्यक्ष शामराव बोलकर व भाजपचे तालुका सरचिटणीस मित्रानंद जाधव यांच्या तक्रारीनुसार चौकशी करण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा फडोळ तसेच निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपुत यांनी दिले आहे.

पालखेड बंधारा येंथे दफनभुमिच्या नावाखाली अतिक्रमण झाल्याची शामराव बोलकर व मित्रानंद जाधव यांची तक्रार आहे. ग्रामपंचायत पालखेड बंधारा यांच्याकडे गट क्र. ३२६ निहीत असल्याने शासकीयं जमिनीवरील अतिक्रमणास प्रतिबंधक करणे व सदर जमिन ज्या शासकीय विभागाच्या ताब्यात आहे त्या विभागाची जबाबदारी असल्याने संबंधित ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांनी तक्रारी अर्जात नमुद केलेल्या प्रमाणे अतिक्रमणाबाबत खात्री करुन आवश्यक ती कार्यवाही करणे अपेक्षित होते. तथापी याबाबत कुठलीही कार्यवाही केलेली दिसत नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांचा खुलासा घेवून आवश्यकता भासल्यास विभागीय चौकशी प्रस्ताविक करण्यात यावे, असा अहवाल सादर केलेला आहे. याप्रमाणे गटविकास अधिकारी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा खुलासा घेवून नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी, असे आदेश निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपुत यांनी जि.प.च्या उपमुख्य अधिकाऱ्यांना काढले आहे. त्यावरुन जि.प.च्या उपमुख्य अधिकारी डॉ. वर्षा फडोळ यांनी दिंडोरी गटविकास अधिकाऱ्यांना चौकशी पत्र दिले असून तक्रारदारांचे शंकानिरक्षण करुन अतिक्रमणाबाबत आपण काय कार्यवाही केली. याबाबत तक्रारदारांना कळविले नसल्याने तक्रारदार आंदोलन करु शकतात. तसेच दिशाभूल करणारा अहवाल सादर केलेला आहे, असा ठपका डॉ. वर्षा पडोळ यांनी ठेवला आहे.

# कृषी महाविद्यालयात शाश्वत शेती दिनानिमित्त संवादसत्र

**नाशिक ।** महात्मा फुले कृषी विद्यापीठ संचलित मराठा विद्या प्रसारक समाजाचे कर्मयोगी दुलाची सिताराम पाटील कृषी महाविद्यालय, चाचडगाव, नाशिक येथे "शाश्वत शेती दिना" च्या औचित्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



भारतातील हरित क्रांतीचे प्रणेते भारतरत्न डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांचे कृषी क्षेत्रातील भरीव योगदानाला अभिवादन म्हणून त्यांच्या जन्मशताब्दी जयंतीच्या निमित्ताने यावर्षीपासून "शाश्वत शेती दिन" साजरा केला जातो आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण अधिकारी डॉ. अजित मोरे होते त्यासोबतच स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य मा. श्री सनी वाणी व इतर मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. प्रस्ताविकात प्राचार्य डॉ. बापूसाहेब भाकरे यांनी डॉ.एम. एस. स्वामीनाथन यांच्या दैदिप्यमान कृषी कार्याची व त्यांच्या प्रेरणादायी जीवन प्रवासाची ओळख करून दिली . डॉ. स्वामीनाथन यांनी गहू आणि भात पिकांची उत्पादकता व उत्पादन वाढीकरता केलेल्या उल्लेखनीय संशोधनामुळे भारत देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाल्याचे त्यांनी नमूद केले तसेच डॉ.स्वामीनाथन यांनी शाश्वत शेती, हवामान अनुकूलन महिला शेतकरी सक्षमीकरण याबाबत केलेल्या दूरदृष्टीपूर्वक कार्याचाही उपस्थितताना आढावा दिला. तसेच उपस्थित पालकांना व विद्यार्थ्यांना प्रेझेंटेशनच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या भव्य दिव्य सुसज्ज इमारती व सर्व प्रयोगशाळा स्पोर्ट्स सांस्कृतिक कार्यक्रमाची ओळख करून दिली. म.वि प्र. शिक्षण अधिकारी डॉ. अजित मोरे यांनी अध्यक्षीय भाषणात बोलताना मविप्रच्या कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भविष्यात शाश्वत शेती सेंद्रिय शेतीमध्ये संशोधन करून देशाच्या भविष्यातील शेती क्षेत्रात योगदान करण्याचे आवाहन केले. पालक विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सदर संवाद सत्र आणि शाश्वत शेती दिन कार्यक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला.

### महत्त्वाचे

## घोटीत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदेंना बांधली राखी

**बेलगाव कुऱ्हे ।** महाराष्ट्र राज्यातील आयाबहिणींचे रक्षण करून त्यांच्यावरील होणाऱ्या



अन्यायाचा प्रतिकार सातत्याने करावा. यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या घोटीत आगमनावेळी तालुकाध्यक्ष शैला कुंदे यांनी रक्षाबंधनानिमित्त त्यांना राखी बांधली. यावेळी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांचे इगतपुरी तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्यांकडून स्वागत करण्यात आले. याप्रसंगी आ. सुनील भुसारा, जिल्हाध्यक्ष संगीता पाटील, उपजिल्हाध्यक्ष मिरा भोईर, कळवण अध्यक्ष खुशी मोरे, संगीता जाखेरे यांनी प्रत्यक्ष संवाद साधून राजकीय सामाजिक विषयांवर चर्चा केली.

# वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी पाथर्डी फाटा चौकात भुयारी मार्ग करा

## आ. हिरेंची केंद्रीय मंत्री नितीन गडकरींकडे आग्रही मागणी



**नाशिक ।** पाथर्डी फाटा येथील चौकात रोजच होणारे अपघात आणि भीषण वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी आज आ.सीमा हिरेंनी दिल्लीत जात केंद्रिय रस्ते,वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. नाशिक- मुंबई महामार्गावरील पाथर्डी फाटा येथील चौकात रोज होणाऱ्या वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी या ठिकाणी लवकरात लवकर भुयारी मार्ग तयार करण्याची आग्रही मागणी आ.हिरेंनी नामदार गडकरी यांच्याकडे केली आहे.दरम्यान ना.गडकरी यांनी लगेचच संबधित अधिकाऱ्याला फोन करून सदरचे काम लवकरात लवकर सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

पाथर्डी गाव, नाशिककडून मुंबईच्या दिशेने जाणारी आणि मुंबईकडून येणारी वाहने, अंबड आणि सातपूर औद्योगिक वसाहतीत कामावर जाणाऱ्या कर्मचाऱ्यांची वाहने पाथर्डी फाटा चौक परिसरातून ये -जा करत असतात. परिसरात हॉस्पीटल आणि विद्यालये, महाविद्यालयांची संख्या मोठी असल्याने रूग्ण त्यांचे नातेवाईक तसेच विद्यार्थांची पाथर्डी फाटा चौक परिसरात मोठी वर्दळ असते.परिणामी सदर चौकात सतत वाहतूकीची मोठी कोंडी होत आहे.

वाहतूक कोंडीतून नागरिकांना दिलासा देण्यासाठी आ.सिमा हिरेंनी दिल्लीत जात नामदार नितीन गडकरी यांची भेट घेतली. पाथर्डी फाटा लगतचा ग्रामिण भाग मोठ्या प्रमाणावर विकसीत होत आहे. तसेच इंदिरानगर, राणेनगर, नाशिकरोड या ठिकाणांवरून अंबड, सातपूर औद्योगिक वसाहतीकडे जाणारी वाहनेही पाथर्डी फाटा चौक परिसरातूनच ये- जा करत असल्याने येथे वाहतूकीची सतत मोठी कोंडी होत असते.यामुळे नागरिक आणि वाहनचालकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्याचे आ.हिरेंनी ना.गडकरी यांच्या निदर्शनास आणून दिले. सिहंस्थाच्या पाश्वभूमीवर वाहतूक कोंडीमुक्त चौक होणे अत्यंत गरजेचे असून या ठिकाणी लवकरात लवकर भुयारी मार्ग तयार करण्याची आग्रही मागणी आ.हिरेंनी नामदार गडकरी यांच्याकडे केली आहे.ना.गडकरी यांनी लगेचच संबधित अधिकाऱ्याला फोन करून सदरचे काम लवकर सुरू करण्याच्या सूचना देत सकारात्मक प्रतिसाद दिला.

# रक्षाबंधन : स्नेहाचे ऋणानुबंध चिरकाल टिकावेत!




# रक्षाबंधन

श्रावणमास पर्व हे समाज जीवनाचे प्रतिबिंब आहे. रक्षाबंधन हे एक सामाजिक व धार्मिक पर्व आहे. हे पर्व सामाजिक परंपरेमध्ये सद्भाव, स्नेह, आत्मियता, बंधुभाव, कौटुंबिक एकात्मता यांचा प्रवाह निर्माण करणारे आहे. खऱ्या अर्थाने संस्कृतीला समृध्द बनविणारे, आध्यात्मिक स्पर्शाने जनमनाला पुलंकित करणारे पर्व आहे, रक्षाबंधन पर्व!

--------------

राणी कर्णावतीने आपल्या रक्षणासाठी हुमायूँ राजाला भाऊ मानून बांधलेली राखी इतिहासाच्या पानावर कोरल्या गेली. हिंदू-मुस्लिम यांच्यामधील स्नेह व एकी निर्माण करणारी ही जीवंत साक्षच आहे. स्त्री जातीच्या रक्षणासाठी धर्म, जाती, लिंग या भेदांना छेदून पुढे टाकलेले एक पाऊल आहे हे!

राष्ट्रीय एकात्मेला पोषक व वर्धक प्रसंग समाजात सद्भावना व सत्प्रवृत्तींचे पोषण करण्याचे कार्य करतात. आपल्या भाऊरायाला बहीण राखी बांधते व आपल्या रक्षणाची अप्रत्यक्षरीत्या हमी घेते. हिंदू संस्कृतीतील समाजमुल्यांचे पोषण करणारी ही सामाजिक परंपरा आजही मोठया दिमाखाने देशात सर्वत्र नांदतांना दिसत आहे.

हिंदू पौराणिक कथेनुसार, महाभारतात, जे एक महान भारतीय महाकाव्य आहे, पांडवांची पत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाच्या मनगटामधून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी तिने तिच्या साडीचा कोपरा फाडून त्याच्या मनगटावर बांधला. त्यामुळे भगवान श्रीकृष्ण यांच्यात एक बंध निर्माण झाला आणि द्रौपदीचे रक्षण करण्याचे वचन त्यांनी तिला दिले.

राखी बांधताना बहिणीने म्हणावे,

*येन बद्धो बली राजा*
*दानवेन्द्रो महाबलः।*
*तेन त्वामनुबध्नामि*
*रक्षे मा चल मा चल*

(दानवांचा राजा बली यांच्या हातात दैत्यगुरू शुक्राचार्य यांनी जशी रक्षा (राखी) बांधली होती तशीच ही राखी मी तुझ्या हाताला बांधत आहे)

रक्षाबंधनाची सुरुवात केव्हा झाली, याबद्दल निश्चित पुरावा नाही; पण त्याविषयी एक आख्यायिका आहे. पूर्वी देवदानवांच्या युद्धात दानवांच्या शक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवांचा राजा वृत्रासुर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला.

त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शुची हिने विष्णूकडुन मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळेल, अशी तिची श्रद्धा होती. शेवटी श्रध्दा खरी ठरली आणि इंद्राचा विजय झाला आणि त्याचे गेलेले वैभव परत मिळाले. या प्रसंगाची आठवण म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगितले जाते.

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला रक्षाबंधन म्हणतात.

या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो. हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पौर्णिमेस राखी बांधावी, असे धर्मशास्त्रात म्हणले आहे. या विधीस पवित्रारोपण असेही म्हणतात. भावाचा उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते.

उत्तर भारतात हा सण राखी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून भावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो मिळो, अशी कामना करतात. राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतःला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे.

राखी बांधण्याच्या या सणातून स्नेह व परस्परप्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण करण्याचे वचन देणे. काही प्रांतात नोकर आपल्या मालकाला, ब्राह्मण आपल्या यजमानाला, मुलगी आपल्या वडिलांना, आणि पत्नी नवऱ्याला राखी बांधते. आपल्यापेक्षा बलवान, समर्थ माणसाला राखी बांधून आपल्या रक्षणाचे वचन घेणे हीच यामागची भावना आहे.




भारतीय समाजात ऐक्य आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण राजपूत लोकांत रूढ झाला. आजकाल मात्र बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणून हा सण साजरा होतो. या दिवशी बहिणी आपल्या सख्ख्या भावाच्या हातावर राखी बांधतातच आणि शिवाय त्या बंधुत्वसमान नाते असलेल्या व्यक्तीसही राखी बांधतात.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

उत्तर भारतातील ग्रामीण भागांत जिथे अनेक खेड्यांमध्ये बहिर्विवाह पद्धती प्रचलित आहे, तिथे मोठ्या संख्येने विवाहित हिंदू स्त्रिया दरवर्षी त्यांच्या पालकांच्या घरी सणासाठी परत जातात. त्यांचे भाऊ, जे विशेषतः पालकांसोबत किंवा जवळपास राहतात, कधीकधी त्यांच्या बहिणींच्या विवाहित घरी त्यांना परत घेऊन आणण्यासाठी जातात.

अनेक तरुण विवाहित स्त्रिया त्यांच्या जन्माच्या घरी काही आठवड्यांपूर्वी येतात आणि समारंभ होईपर्यंत राहतात. भाऊ हे बहिणीचे सासर आणि माहेर यांच्यामध्ये आजीवन मध्यस्थ म्हणून काम करतात.

शहरी भारतात जिथे कुटुंबे अधिकाधिक विभक्त होत आहेत, तिथे हा सण अधिक प्रतीकात्मक बनला असला तरीही तो खूप लोकप्रिय आहे. या उत्सवाशी संबंधित विधी त्यांच्या पारंपारिक प्रदेशांच्या पलीकडे पसरले आहेत. तंत्रज्ञान, स्थलांतर, चित्रपट, सामाजिक संवाद, आणि हिंदू धर्माच्या राजकीय प्रचाराद्वारे या सणाचे स्वरूप बदलले जात आहे.

रक्ताचे नाते नसलेल्या स्त्रिया आणि पुरुषांमध्ये स्वैच्छिक नातेसंबंधांची एक बदललेली परंपरा देखील आहे. यासाठी जाती आणि वर्गाच्या पलीकडे, तसेच हिंदू आणि मुस्लिम हा भेद विसरून राखी बांधली जात आहे.

जैन परंपरेमध्ये सातशे मुनींवर दृष्ट प्रवृत्तीने केलेल्या उपसर्गाला दुर करण्याचे कार्य या पर्वमध्ये झाले. जैन लोक रक्षाबंधनाच्या दिवशी जैन मंदिरात जाऊन अभिषेक-पूजन करुन मुनीं प्रती हृदयभाव ठेवून पंडित-पुजाऱ्यांच्या हस्ते राखी बांधून हे पर्व साजरे करतात. धर्मरक्षणाचे चकं कण आहे ते !

प्रथम धार्मीक व नंतर सामाजिक दायित्व पार पाडले जाते. हे पर्वधर्म व धर्मावलय यांच्येशी मातृत्व भावनेतून जोडणारे आहे. संस्कृती व धर्म समर्पणाच्या भावनेला वृध्दिगत करणारे आहे. श्रमण संस्कृतिमध्ये रक्षाबंधनाचे आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. ईश्वरप्रती समर्पणाची भावना व संस्कृतिचा अत्यंत आदरया भावनांना श्रेष्ठस्थान दिले गेले आहे.

सामाजिक दृष्टिकोनातून रक्षाबंधन हे वात्सल्य व बंधुभावाचे परिपाक पर्व आहे. बंधुभाव व स्नेहवर्धनाचे पाठया पवार्मुळे गिरविले जातात. समाज व धर्म या पेक्षाश्रेष्ठ आहे राष्ट्रधर्म ! म्हणून सामाजिक व धार्मीक अस्तित्व टिकविण्याची आज राष्ट्राचे अस्तित्व टिकविण्याची, त्याचे जतन करण्याची गरजभासत आहे. ही महान जबाबदारी आज आपणांवर आहे. ती नेटाने करणे गरजेचे आहे, त्यामुळेही घडी नीट घट्ट बसेल.

आलमगीर बादशहा दिल्लीवर राज्य करीत होता. त्याच्या प्रधानाने कट आखून बादशहाचा खून केला व प्रेत नदीत टाकून दिले. एका स्त्रिने ते पाहिले. प्रेत वाहून जाऊ नये म्हणून तिने प्रेत पाण्याबाहेर काढले आणि प्रेताचा वाली येईपर्यंत प्रेताजवळ बसून राहिली. बऱ्याच वेळानंतर बादशहाच्या शोधात सैनिक तेथे आले. बादशहाचा मुलगा शहाआलम याने त्या हिंदू स्त्रीचे आभार मानले. तिला आपली बहीण मानले. ती हिंदू स्त्री पुढे दरवर्षी शहाआलमला राखी बांधू लागली. ही प्रथा पुढे अकबरशहा व बहादूरशहा यांनीही चालू ठेवली. इतिहासात याचा उल्लेख आहे. मुघल बादशहानी पवित्र मानलेला हिंदूंचा हा एकमेव सण आहे.

या श्रावण पौर्णिमेला पोवती पौर्णिमा असेही म्हणतात. कापसाच्या सुताच्या नवसुती (नऊ धाग्यांची जुडी) करून तिला आठ-बारा किंवा चोवीस गाठी मारतात व त्यांच्या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू, महेश, ओंकार, सूर्य इत्यादी देवतांचे आवाहन करून हे पोवते प्रथम देवास वाहून नंतर तसलीच पोवती कुटुंबातील माणसांच्या मनगटावर बांधली जातात.

रक्षाबंधनाच्या निमीत्ताने पर्यावरणाचे रक्षण, ऑलिम्पिक खेळाडूंना शुभेच्छा आणि स्त्रीभृणहत्या रोखण्याचा संदेश राखीच्या माध्यमातून करण्याचा निर्धार भाऊ-बहिण आणि समस्त भारतीयांनी या नाजुक पर्वावर केला पाहिजे. रक्षाबंधन निमित्त सर्व बंधु-भगिनींना मनःपूर्वक शुभेच्छा!

## रक्षाबंधन आणि स्त्री सुरक्षा!

हिंदू संस्कृतीत भाऊ-बहिणीचे नाते हे अत्यंत पवित्र मानले जाते. रक्षाबंधनाच्या दिवशी बहीण भावाच्या मनगटाला राखी बांधून त्याच्याकडून तिच्या रक्षणाचे वचन घेते. भाऊसुद्धा 'प्राणपणाने तुझे रक्षण करेल', असे बहिणीला वचन देतो.

या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उत्तम आरोग्यासाठी आणि समृद्धीसाठी देवाकडे प्रार्थना करते तर भाऊसुद्धा बहिणीच्या दीघार्युष्यासाठी, सुखसंपन्नेतेसाठी आणि संरक्षणासाठी देवाकडे याचना करतो. सहस्त्रो वर्षांची परंपरा लाभलेल्या या सणाला भाऊ बहिणीतील अतुल प्रेमाची, आदराची आणि निष्ठेची जोड आहे.

द्वापारयुगात एकदा भगवान श्रीकृष्णाच्या मनगटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहू लागले, हे पाहताच द्रौपदीने क्षणाचाही विलंब न करता नेसलेल्या भरजरी वस्त्राच्या टोकाचा एक तुकडा फाडून श्रीकृष्णाच्या मनगटाला बांधला. तेव्हापासून बहीण भावाच्या पवित्र नात्याचा हा उत्सव साजरा केला जाऊ लागला.

रक्षाबंधनाच्या दिवशी सूर्योदयी स्नान करतात. उपकर्म करून ऋषींचे तर्पण करतात अपराह्नकाळीं राखी तयार करतात. तांदूळ, सोने आणि पांढऱ्या मोहऱ्या एकत्र करून त्यांची पुरचुंडी तयार केली जाते, जिला राखी म्हटले जाते. या राखीचे पूजन केले जाते . त्यानंतर

*'येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः ।*
*तेन त्वामपि बध्नामि रक्षे मा चल मा चल ॥'*

हा मंत्र म्हणून बहीण भावाला ही राखी बांधते. 'महाबली दानवेद्र बळी राजा जिने बद्ध झाला, त्या रक्षेने मी तुलाही बांधतो. हे रक्षे, तू चलित होऊ नकोस' असा या मंत्राचा अर्थ आहे.

कालागणिक हा सण साजरा करण्याची पद्धत जरी बदलली असली, तरी सणामागील उद्देश मात्र तोच आहे. आज आपला भाऊ साता समुद्रापार जरी असला तरी बहीण त्याला राखी पाठवायला विसरत नाही. ज्या बहिणींना सख्खा भाऊ नसतो ती अन्य पुरुषाला किंवा चंद्राला आपला भाऊ मानते आणि हा सण साजरा करते.

*यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः*
*यात्रेतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः*

अर्थात ज्या कुळामध्ये स्त्रीची पूजा, म्हणजेच तिचा मान- सन्मान होतो, त्या कुळात सुशील आणि गुणसंपन्न संतती जन्माला येते. ज्या ठिकाणी स्त्रीचा अपमान होतो त्या कुळाची प्रगती खुंटते हा संस्कार हिंदू धर्मग्रंथांनी केल्यामुळे हिंदू धर्मात स्त्रीला नेहमीच आदराचे आणि सन्मानाचे स्थान दिले गेले आहे.

रक्षाबंधन हा सणसुद्धा स्त्रीच्याप्रती आदर व्यक्त करणाराच आहे. आठशे वर्षांपूर्वी संत ज्ञानेश्वरांनी पसायदानातून विश्वबंधुत्वाची शिकवण दिली आहे. लहानपणी शाळेतसुद्धा सारे भारतीय माझे बांधव आहेत, अशी प्रतिज्ञा करूनच प्रत्येक जण मोठा झाला आहे. दुर्दैवाने या सर्वांचा आजच्या तरुण वर्गाला विसर पडला आहे.

आजमितीला देशासह राज्यातील स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. दोन वर्षाच्या बालिकेपासून ८० वर्षांची वृद्धाही नराधमांच्या वासनेतून सुटत नाही.

आपल्या बहिणीला रक्षणाचे वचन देणारा भाऊ अन्य स्त्रीमध्ये आपल्या भगिनींचे रूप का पाहू शकत नाही. आपल्या संस्कृतीचा आपल्यालाच विसर पडू लागला आहे का?

छत्रपती शिवाजी महाराज हे आजच्या पिढीचे दैवत आहेत, आजचा तरुण एकवेळ आईवडिलांचा अपमान सहन करेल; मात्र छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अपशब्द काढणाऱ्याची जीभ छाटल्याशिवाय राहणार नाही. आज मंदिरातील देवांच्या मूर्ती शाबूत आहेत ते छत्रपती शिवाजी महाराजांमुळेच.

पाच बलाढ्य पातशाह्यांविरोधात लढून महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. रयतेला भयमुक्त केले. व्यापाराचे निमित्त करून सत्ताकारणात ढवळाढवळ करू पाहणाऱ्या इंग्रजांना त्यांची जागा दाखवून दिली. आपल्या अधिकाराचा गैरवापर करून महिलेवर अत्याचार करणाऱ्या रांझे पाटलाचा चौरंगा करून छत्रपती शिवाजी महाराजांनी एक आदर्श स्वराज्यासमोर निर्माण केला.

स्वराज्यातील स्त्रीकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्याची काय स्थिती होऊ शकते याचे उदहारण त्यांनी जगासमोर उभे केले. त्यानंतर कोणाची हिम्मत झाली नाही स्वराज्यातील स्त्रियांकडे वासनेच्या नजरेने पाहण्याची.

शिवाजी महाराजांना देव मानणारा आजचा तरुण लुटीच्या मुद्देमालासह आलेल्या कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला सन्मानाने स्वगृही पाठवणाऱ्या शिवाजी महाराजांची वृत्ती अंगी केव्हा बाणवणार आहे? स्वराज्यातील बाया बापड्यांच्या रक्षणासाठी स्वतःचे प्राण धोक्यात घालणाऱ्या संभाजी महाराजांचा आदर्श आजचा तरुण कधी अंगिकारणार आहे?

जो देश आपल्या इतिहासातून धडे घेत नाही तो देश रसातळाला जातो अशी एक म्हण आहे. आजच्या तरुणांची स्थितीही काहीशी अशीच झाली आहे.

आज तरुणांना गरज आहे इतिहासातील थोर पुरुषांच्या चरित्रातून धडे घेऊन आपले चारित्र्य घडवायची. आजचे सरकार राज्यातील भगिनींना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने अंतर्गत दरमहा १५०० रुपये देत आहे ; मात्र बहिणींना केवळ आर्थिक साहाय्य करणे एव्हढेच भावाचे कर्तव्य नसून बहिणीच्या रक्षणाची सर्वस्वी जबादारी घेणे हे भावाचे प्रमुख दायित्व आहे.

राज्याची परिस्थिती पाहता राज्यातील भगिनींना आर्थिक मदतीपेक्षा सुरक्षिततेचीच अधिक आवश्यकता आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील महिलेवर अत्याचार करणाऱ्या रांझे पाटलाचे हात पाय कलम करून वासनांधांवर अंकुश निर्माण केला होता. महाराष्ट्रातही अशा कठोर कायद्याची आज नितांत गरज आहे.

स्त्री अत्याचाराच्या विरोधात ज्यावेळी कठोर कायदे अमलात येऊन त्यांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली जाईल, ज्या दिवशी स्त्री अत्याचाराचा आलेख घसरू लागेल आणि ज्या दिवशी एका स्त्रीच्या रक्षणासाठी हजारो मनगटे पुढे सरसावतील त्या दिवशी रक्षाबंधनाचा उद्देश खऱ्या अर्थाने साध्य झाला असे म्हणता येईल.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

■ ■ ■

## रक्षाबंधनाचे आध्यात्मिक वैशिष्ट्य!

अध्यात्मशास्त्रानुसार जीवांमधील देवाण घेवाण हिशोब संपवून ईश्वरप्राप्ती करून घेण्यासाठी आत्म्याला मानवी जन्म लाभतो. मात्र मानवी जन्मात केलेल्या चांगल्या वाईट कमार्मुळे त्याला पाप-पुण्य लाभते आणि त्याचे फळ भोगण्यासाठी त्याला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो. मानवी जन्मात मिळणारे नातेवाईक, आप्तेष्ट, शेजारी-पाजारी, मित्र मंडळी हा सर्व गोतावळा आपल्याभोवती निर्माण होण्यामागे त्यांच्याशी गेल्या अनेक जन्मांचे आपल्याशी असलेले देवाण घेवाण हिशोब पूर्ण करणे हेच कारण असते.

बहीण-भावाचे नाते निर्माण होण्यामागेही हेच कारण आहे. रक्षाबंधन आणि भाऊबीज या सणांमागे पौराणिक कथांचा आधार असला तरी या दोघांतील देवाण घेवाणीचा हिशोब पूर्ण करण्यासाठीच रक्षाबंधन, भाऊबीज या सणांची निर्मिती झाली आहे. स्थूल रूपाने रक्षाबंधन हे जरी बंधन वाटत असले, तरी सूक्ष्म रूपाने वर्षागणिक हा हिशोब पूर्ण होत असतो. त्यामुळे ही संधी बहीण आणि भावाने सोडू नये असे म्हटले जाते. हल्ली रक्षाबंधनाच्या दिवशी भाऊ आपल्याला काय भेटवस्तू देणार याकडे बहिणीचे विशेष लक्ष असते. आध्यात्मिकदृष्ट्या बहिणीने मनात अशी अपेक्षा बाळगल्यास तिला त्याचा अध्यात्मिक लाभ होत नाही. त्यामुळे रक्षाबंधन हे निरपेक्ष भावानेच साजरे व्हायला हवे.

■ नरेश घरत, चेंबूर

## तेच खरे रक्षाबंधन!

रक्षाबंधनाच्या दिवशी बहीण आपल्या भावाला राखी बांधून त्याच्याकडून तिच्या रक्षणाचे वचन घेते. त्रेतायुगापासून सुरु असलेल्या या प्रथेला बंधू भगिनीतील प्रेमाची झालर आहे. काळ बदलला तशी स्त्री अधिकाधिक असुरक्षित होत गेली आहे. आज स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना प्रतिदिन आपल्याला वर्तमानपत्रांतून वाचायला मिळतात. गेल्या दहा वर्षांत स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. कोणत्याही स्त्रीवर प्रतिकूल प्रसंग कधी ओढवेल, ही वेळ सांगून येत नाही.

अशा प्रत्येक कठीण प्रसंगी आपला भाऊ आपले रक्षण करण्याकरिता धावून येईलच असे नाही. यासाठी प्रत्येक स्त्रीने प्रतिकूल प्रसंगात आपले रक्षण कसे करावे, याचे सामान्य प्रशिक्षण घेणे अत्यावश्यक आहे. स्व संरक्षण प्रशिक्षणाने केवळ शारीरिक नव्हे, तर मानसिक बळही वाढते. आजची स्त्री भौतिकदृष्ट्या उत्तुंग शिखरे पादाक्रांत करत आहे; मात्र समाजाची ढासळलेली नीतिमत्ता तिचे खच्चीकरण करू पाहत आहे. अशा समाजाला तोंड देण्यासाठी मन आणि शरीर सामर्थ्यवान करण्याची आज नितांत गरज आहे, रक्षाबंधनाच्या दिवशी जेव्हा प्रत्येक स्त्री आपल्या भावाला अभिमानाने सांगेल, कि माझे रक्षण मी स्वतः करू शकते, ते रक्षाबंधन खरे रक्षाबंधन असेल.

सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.

## राखीचं खरं मोल
## प्रेम, कर्तव्य आणि संस्कार

रक्षाबंधन हा सण श्रावण पौर्णिमा या तिथीला साजरा केला जातो. या वर्षी ही तिथी ९ ऑगस्ट २०२५ या दिवशी आहे. बहीण आपल्या भावाचे औक्षण करून त्याला प्रेमाचे प्रतीक म्हणून राखी बांधते. भाऊ आपल्या बहिणीला ओवाळणी म्हणून भेटवस्तू देऊन तिला आशीर्वाद देतो. राखी बांधण्यामागे भावाचा उत्कर्ष व्हावा आणि भावने बहिणीचे संरक्षण करावे, ही भूमिका असते.

रक्षाबंधन या सणाच्या माध्यमातून ज्याप्रमाणे भाऊ आणि बहीण यांच्यातील प्रेम व्यक्त केले जाते, त्याचप्रमाणे त्यांच्यातील देवाण-घेवाणही न्यून होत असतो. त्यामुळे हा सण भाऊ आणि बहीण या दोघांना ईश्वराकडे घेऊन जाणारा ठरतो.

रक्षाबंधन हे एक नात्यांचं, प्रेमाचं, आणि कर्तव्यभावनेचं प्रतिक आहे. पूर्वीच्या काळात या सणामध्ये भावंडांमध्ये केवळ गोड बोलचाल नव्हती, तर त्यात कर्तव्याची जाणीव होती, सुरक्षेचं आश्वासन होतं, आणि निरपेक्ष प्रेम असायचं. आजच्या काळात, हा सण साजरा होतो पण त्यामागचं खरं महत्व, त्याची भावनात्मक खोली ही कुठेतरी लुप्त होतेय. राखीचा सण म्हणजे आता फॅन्सी वस्तू, गिफ्ट्स, किंवा पैशांची अपेक्षा असे व्यापारी स्वरूप घेत आहे.

कु. राधा प्रमोद पिंपळापुरे
उमरेड

महाभारतात द्रौपदीने श्रीकृष्णाच्या हाताला राखी बांधली होती, आणि कृष्णाने तिचे रक्षण केले होते. यावरुन आपल्याला लक्षात येते की रक्षाबंधन हे स्त्रीच्या असुरक्षिततेवर नव्हे, तर स्त्रीच्या विश्वासावर आधारित सण आहे.

रक्षाबंधनाचा मूळ हेतू हा केवळ भावाला राखी बांधण्यापुरता मर्यादित नाही, तर रक्षणाचे कर्तव्य, भावना ही रक्ताच्या नात्यांपेक्षा मोठी असते याची जाणीव करून देणारा आहे .

म्हणजेच स्वतः सक्षम व्हायचे आणि इतरांचेही रक्षण करायचे. आज राखी चे स्वरूप बदलत चालले आहे. जेवढी मोठी भेट तेवढ जास्त प्रेम.

इथेही नात्यामधल्या ओलाव्यापेक्षा व्यावहारिक स्वरूप आले आहे. भावांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की आज आपल्या बहिणी असुरक्षित आहेत. त्यांचे संरक्षण करणे, त्यांना मानसिक आधारासोबतच स्वसंरक्षण प्रशिक्षण देणे आज काळाची गरज बनली आहे. आणि हीच खरी राखीची भेट ठरणार आहे.

आई-वडिलांनीही मुलांवर असे संस्कार लहानपणापासूनच रुजवायला हवेत. रक्षाबंधन हे प्रेम, कर्तव्य आणि नात्याची जाणीव करून देणारा , सामाजिक बांधिलकी जपणारा सण आहे . केवळ आपली बहीणच नव्हे, तर समाजातील स्त्रियांचे ही रक्षण करण्याची जबाबदारी भावाच्या मनगटात आहे. हाच बहिणीने भावांना राखी बांधण्यामागील खरा उद्देश आणि हिच खरी भेट.

आपण सण साजरे करतो त्या मागचं सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक मूल्य आपण पुढच्या पिढीला शिकवायला पाहिजे. रक्षाबंधन हा एक दिवसापुरता सण न राहता तो समाजमनाचा संस्कार बनेल. चला तर मग आज आपण संकल्प करूया सण साजरे करायचे पण त्याचं मोल समजून. नातं जपायचं पण त्यात प्रेम, समर्पण आणि जबाबदारी जाणून.

■ ■ ■



### सण 'रक्षाबंधनाचा'

सण उत्साह-आनंदाचा,
नारळीपौर्णिमा - रक्षाबंधनाचा,
बहिण-भावाच्या पवित्र नात्याचा
प्रेमाच्या देवाण-घेवाणीचा

हतावर साज चढला,
रंगी-बेरंगी राख्यांचा....
राखी - नारळ - मिठाई,
दिव्याने रंग वाढला तबकाचा

टिळा लावूनी ओवाळीते
मान आज हा भावाचा,
राखी बांधुनी पेढा भरविते
घास असे हा प्रेमाचा....

लाभो तुला दीघार्युष्य
मिळो आशीर्वाद ईश्वराचा
राहो संकटे तुझ्यापासून दूर
एकची ध्यास तुज्या बहिणीचा

नको काही भेटवस्तू
नको दागिना सोन्या-चांदीचा
आठवण तुला सदा राहावी
क्षण असो सुखाचा वा दुःखाचा

तुझ्यासारखा भाऊ लाभला
भाग माज्या पूर्वपुण्याईचा
असेच राहावे नाते आपुले
करार हा जन्मोजन्मीचा

करुया सण साजरा रक्षाबंधनाचा
बहिण-भावाच्या पवित्र नात्याचा....!

ज्योती रावराणे
कांजूरमार्ग, मुंबई.

## रक्षाबंधन बहिण-भावांचे पवित्र नाते

रक्षाबंधन हा सण बहिण-भावाचा सण म्हणून ओळखला जातो. राखीचा धागा साधासुधा नसुन अतुट बंधन आहे.भारतात सर्वच जातीधर्माचे लोक रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करतात. यात भावाने बहिणीला दिलेले वचन अत्यंत महत्त्वाचे असते. पंचागानुसार श्रावण महिन्यातील म्हणजे राखी पौर्णिमा याला नारळी पौर्णिमा सुध्दा म्हणतात.

भारतात संपूर्ण राज्यात राखी पौर्णिमा वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते. उत्तर भारतात कजरी पौर्णिमा,पश्चिम भारतामध्येनारळी पौर्णिमाया नावाने हा सण साजरा केला जातो. पुराणात सांगितल्याप्रमाणे श्रावण पौर्णिमेला मोठ्यांचे आशीर्वाद पवित्र मानल्या जाते. पुर्वी मध्ययुगीन काळात भारतामध्ये बाहेरील आक्रमणापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत असे. महाभारतात सुध्दा बहिणभावाचे अतुट बंधन दिसून येते.

रक्षाबंधनाची परंपरा दैवी काळापासून तर आजपर्यंत आजतागायत सुरू आहे. चित्तोढगडची राणी कर्मावती हिने बहादुरशहा पासून आपली रक्षा करण्यासाठी मुघल बादशहा हुमायूला राखी बांधली होती. राखी बांधल्यानंतर राजा हुमायूने राणी कर्मावतीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली असे सांगण्यात येते.

यावरून स्पष्ट होते की भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी प्राण जाये पर वचन न जाये अशी भूमिका बहिणीबद्दल भावांमध्ये दिसून येते. सध्या बहिण - भावाप्रमाणे आज वृक्षांना आपल्या बंधनात बांधण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष रहाली तर जमीन (पृथ्वी) राहील, पृथ्वी शाबूत रहाली,तर मानव व संपूर्ण जीवजंतू आणि सृष्टी सुरक्षित राहील.

दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे पृथ्वी डगमगायला लागली आहे यामुळे भूस्खलन, भूकंप, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती थंडी,अती उष्णता, अती पाऊस अशाप्रकारच्या कधीच न घडलेल्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत याकरीता पृथ्वीला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर असल्यामुळे जास्तीत जास्त वृक्षारोपण अती आवश्यक आहे.

बहिणीने भावाला राखी अवश्य बांधावी. परंतु सोबतच एक वृक्ष भेट देऊन त्यांची जोपासना करण्याचे वचनसुध्दा घ्यावे.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

दिवसेंदिवस हवामानात बदल होत असून, अनेक पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे व काही पशुपक्षी व वृक्ष लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. पुर्वी मुसळधार व संथ गतीने पाऊस यायचा. परंतु बदलत्या हवामानामुळे मुसळधार पाऊसाचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते व यामुळे ढगफुटीचे व सुनामीचे प्रमाण सुध्दा वाढले आहे.

यामुळे मानवी हानी, शेतीचे नुकसान, वित्तीय हानी, समुद्राच्या पातळीत वाढ, सुनामी, भुकंप, वादळ, विज कोसळणे, अती उष्णता, अती थंडी ह्या संपूर्ण भयावह घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते.

मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे येणाऱ्या संकटांशी सामना अवश्य करू शकतो. याकरीता रक्षाबंधनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला हवे. बहिणीने भावाला किंवा भावाने बहिणीला काय मौल्यवान वस्तू भेट द्यायच्या आहेत त्या अवश्य द्याव्यात. परंतु बहिणीने भावाला व भावाने बहिणीला एक -एक वृक्ष भेट देऊन धरतीमातेचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनीच घेतला पाहिजे.

यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल. येणारे पाऊसाचे पाणी जमिनीत मुरेल व पृथ्वीचे संतुलन सुरक्षित राहील, ग्लेशियर वितळणे थांबेल, वणव्याचे प्रमाण कमी होईल, भुकंपावर आळा बसेल, अशाप्रकारे निसर्गावर येणारे संकट वृक्षलागवडीमुळे हळूहळू कमी होण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल.

वृक्षलागवड सांस्कृतिक, सामाजिक, सण उत्सव, राष्ट्रीय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय कार्यक्रम अशा कोणत्याही मार्गाने होने अत्यंत गरजेचे आहे. कारण यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल व हवामानातील वाढता बदल यावर अंकुश लावण्यास सर्वांचा हातभार कामी येईल. त्यामुळे रक्षाबंधनाचे औचित्य साधून बहिण-भावाने वृक्ष भेटीवर जास्तीत जास्त भर देण्याची गरज आहे. सरकारने राज्यात लाडकी बहिण योजना अंमलात आणली याचे मनापासून स्वागतच अशा प्रकारच्या योजना अंमलात आणल्यानंतर प्रत्येकांना सरकारने एक-एक वृक्ष भेट देऊन पर्यावरण वाचविण्याच्या बंधनात सहभागी केले पाहिजे. अशी अपेक्षा या सणनिमित्त करण्यास हरकत नाही.

■ ■ ■

# आदिवासी समाज व्यवस्थेचा बळी...!

संपूर्ण विश्वातील आदिवासी समाजाचे लोकजीवन, लोकसंस्कृती कमी अधिक प्रमाणात एकसारखी दिसून येते. संपूर्ण जगात विभिन्न देशात आदिवासी समाजाचे वास्तव्य असून हा समाज आदिम समाज आहे. आजच्या आधुनिक यंत्र-तंत्राच्या जगात आदिवासी समाज अजूनही प्रस्थापित समाजापासून शेकडो मैल दूर आहे. आदिवासी समाजाची विशिष्ट अशी निसर्गपूजक संस्कृती आहे. या समाजाच्या विविध बोली संपूर्ण जगातील विभिन्न भाषेची मूळं आहेत. मूलतः हा समाज त्या-त्या देशातील भूमिपुत्र आहे. मात्र, डोंगरदऱ्यात, निसर्गाच्या सानिध्यात राहत असल्याने शिक्षणापासून तसेच आरोग्य व आर्थिकदृष्ट्या मागास राहिला आहे. अठरा विश्व दारिद्र्य त्याच्या पाचवीला पूजले आहे. समाजाला अनेक शक्तींनी सातत्याने जुलूम, जबरदस्ती, अत्याचार, फसवणूक, गुलामगिरीच्या माध्यमातून अनेक धनाढ्य शक्तींनी लुटले आहे. जल, जमीन, जंगलाचा हा भूमिपुत्र मालक त्याच्या जमिनी त्यांचे अधिकार यांच्यावर गदा आणली गेली. हजारो वर्षपासून तो या व्यवस्थेचा बळी ठरला आहे.



प्राचार्य डॉ. भगवानसिंग अ. राजपूत

या अशा आदिम आदिवासी समाजाच्या हिताचे रक्षण व्हावे, आदिवासी समाज विकासाच्या प्रक्रियेत सामिल व्हावा, त्यांना त्यांचे अधिकार प्राप्त व्हावेत, शिक्षण मिळावे, स्वास्थ मिळावे यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने १९९४ साली नऊ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय आदिवासी दिवस म्हणून घोषित केला. तेव्हापासून आपल्या देशातही आदिवासी समाज या समाजातील जागृत, शिक्षित युवकांनी आपल्या अधिकारासाठी समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी, अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी अनेक सामाजिक संघटना स्थापन केल्या. या संस्थांच्या माध्यमातून हा समाज अधिकाधिक जागृत होऊन आज संघटित होताना दिसत आहे.

आज भारतातील विविध प्रांतात मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय आदिवासी दिवस उत्साहाने साजरा करण्यात येतो. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात विशेषतः मुंबई जवळ असलेल्या पालघर व ठाणे या आदिवासीबहुल जिल्ह्यात या दिवशी आदिवासी समाजातील लोक संघटित होतात. आपली लोकसंस्कृती, लोककला, लोकभाषा यांची विहंगम दर्शन घडवतात. आदिवासी समाजाचे महानायक जननायक बिरसा मुंडा, तिलका मांजी, वीर बुधू भगत, क्रांतिवीर गंगा नारायण, शिदो, कान्हू, चांद, भैरो, चक्र बिशोई, जयपाल मुंडा, तंट्या भिल, राघोजी भांगरे हे सर्व क्रांतिवीर यांच्या कार्याचा आजच्या दिवशी संपूर्ण देशात गौरव केला जातो. अशा या महानायकांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात दिलेले योगदान, इंग्रजांना सडो की पडो करून या नायकांच्या क्रन्तिकारी उठावाने भारतीय स्वातंत्र्य लढ्यात क्रांतीची बीजे पेरली.

जोहार या क्रांतिकारी शब्दाने आदिवासींची संघटक शक्ती, आत्म बलिदानाची त्यागाची, समर्पणाची शक्ती प्रामुख्याने सशक्त होताना दिसते. इतर समाजातील पुरोगामी, साम्यवादी, समाजवादी विचाराचे साहित्यिक, विचारवंत आदिवासी समाजाबरोबर त्यांचा न्याय हक्कांसाठी समाजाला साथ देत आहेत. स्वातंत्र्यानंतर हळूहळू शिक्षणाचा प्रचार, प्रसार होत आहे. शाळा, आश्रमशाळा, महाविद्यालयामध्ये आज अनेक युवक-युवती शिक्षण घेऊन आपले अधिकार व कर्तव्याची सांगड घालून परिवर्तनासाठी लढत आहेत. ही समाजाच्या प्रगतीची नांदी असली तरी, आजदेखील महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या घोर यातना पहिल्या तर आदिवासीबहुल जिल्हे विकासापासून मैलो दूर आहेत.

श्रमशाळांची दुरवस्था, दुर्गम भागात दळणवळणाची व्यवस्था पुरेशी नाही, आरोग्य विषयक तुटपुंजी व्यवस्था, पिण्याच्या पाण्याचे दुर्भीक्ष, कुपोषण अशा अनेक प्रश्नांशी लढतांना आदिवासी समाजाला जीवघेणा संघर्षच करावा लागत नाही, तर अनेकांना प्रसंगी जीव गमवावा लागतो. आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला आहे. तरी देखील अजूनही शासन दरबारी आदिवासी समाजाचे न्याय प्रश्न पूर्णपणे सोडवण्यास असमर्थ आहोत. हे दुर्भाग्य आहे. सर्व आदिवासी समाजाला जागतिक आदिवासी दिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा!. जय जोहार, जय आदिवासी. आदिम झाले, आदिम पाहिजे.

**(लेखक तलासरी येथील कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाने जयपालसिंह मुंडा या विशेष पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे. डॉ. राजपूत साहित्यिक असून त्यांची विविध विषयांवरील अनेक पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत.)**



# निसर्गाशी नाते आणि समतेचा संदेश देणारा आदिम समाज

दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस संपूर्ण जगभर जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा केला जातो. २३ डिसेंबर १९९४ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने ठराव ४९/२१४ द्वारे घेतलेल्या निर्णयानुसार, हा दिवस केवळ आदिवासी समाजाच्या अस्तित्वाची नोंद घेण्यासाठी नाही, तर त्यांच्या हक्कांचे रक्षण, सांस्कृतिक वारशाचे संवर्धन आणि जीवनपद्धतीच्या जपणुकीसाठी एक जागरूकतेचा मंच आहे.

भारतातील आदिवासी समाज हा या भूमीचा पहिला नागरिक मानला जातो. त्यांच्या परंपरा, लोककला, गाणी, नृत्य, पोशाख आणि कथा या केवळ सांस्कृतिक अभिव्यक्ती नसून निसर्ग संवर्धन आणि सहजीवन यांचे जिवंत धडे आहेत. जंगल, नद्या आणि जमीन ही त्यांच्या दृष्टीने केवळ साधनसंपत्ती नाहीत, तर जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. निसर्गाशी असलेली ही आत्मीयता त्यांना पृथ्वीचे खरे रक्षक बनवते.



जितेंद्र टोके

तथापि, स्वातंत्र्यानंतरच्या अनेक दशकांत आदिवासी समाजाला विस्थापन, जंगलांचा ऱ्हास, शिक्षण व आरोग्य सेवेतील मागासलेपण, तसेच रोजगाराच्या अभावासारख्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागले. मोठमोठ्या विकास प्रकल्पांच्या नावाखाली त्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या जातात. पण, त्याबदल्यात पुनर्वसनाची हमी किंवा सन्मानपूर्ण उपजीविकेचे पर्याय मिळत नाहीत. संविधानाने दिलेले विशेष संरक्षण आणि वनहक्क कायदा २००६ सारखे उपयुक्त कायदे असूनही, त्यांची प्रभावी अंमलबजावणी अजूनही अपुरी आहे. या परिस्थितीत बदल घडवण्यासाठी केवळ सरकारी योजनांवर अवलंबून न राहता स्थानिक समाजाचा सहभाग आवश्यक आहे.

आदिवासींच्या मातृभाषेतून शिक्षण दिल्यास त्यांच्यापर्यंत ज्ञान अधिक सहज पोहोचू शकते. आरोग्यसेवा दुर्गम खेड्यापर्यंत पोहोचवण्यासाठी मोबाइल हॉस्पिटल्स आणि स्थानिक आरोग्य सेवकांची मदत महत्त्वाची आहे. त्यांच्या पारंपरिक कला, जसे की वारली चित्रकला किंवा लोकनृत्य, यांचे जतन करून पर्यटनाशी जोडल्यास आर्थिक संधी निर्माण होऊ शकतात. शिवाय, जंगल आणि नद्यांचे संरक्षण करण्यासाठी त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचा उपयोग करणे हे आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचे आहे.

आदिवासी समाजाला 'वेगळे' न मानता 'आपले' मानणे ही खरी सामाजिक समता आहे. त्यांना आधार देणे हे उपकार नव्हे, तर नैतिक कर्तव्य आहे. त्यांच्या जीवन पद्धतीतून शिकण्याचा दृष्टिकोन समाजाने स्वीकारला, तर निसर्गाशी असलेला आपला तुटलेला संवाद पुन्हा प्रस्थापित होऊ शकतो. जागतिक आदिवासी दिन हा केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित राहू नये, तर आत्मपरीक्षणाचा दिवस व्हावा. आपण त्यांच्या हक्कांचा सन्मान केला का?. त्यांच्या संस्कृतीला योग्य स्थान दिले का?. आणि त्यांच्या निसर्गाशी असलेल्या नात्याचा आदर राखला का?. या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधण्याची ही वेळ आहे. कारण आदिवासी समाजाचा सन्मान म्हणजेच पृथ्वीच्या भविष्याचा सन्मान होय.

**(लेखक दैनिक महासागरच्या पालघर जिल्हा आवृत्तीचे डहाणू तालुका प्रतिनिधी आहेत)**




महासागर NASHIK Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन.** **PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**